मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २०० ■ मंगळवार, ३१ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# सिडकोचा ऐतिहासिक निर्णय: बंगलो/रो-हाऊस प्लॉटवरील बहुनिवासी इमारतींना मोठा दिलासा

## आ. प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / नवी मुंबई (प्रतिनिधी) :** बंगलो व रो-हाऊस प्लॉटवर उभारलेल्या बहुनिवासी इमारतींच्या नियमितीकरणाचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागला असून, सिडकोच्या संचालक मंडळाने (दि. १२ मार्च २०२६) महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे नवी मुंबईतील शेकडो गृहनिर्माण सोसायट्यांमधील हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. सदर प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. परवानग्या रद्द होणे, हस्तांतरण प्रक्रियेतील अडथळे, तसेच मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासात निर्माण झालेल्या अडचणींमुळे नागरिक त्रस्त होते. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडको प्रशासन व शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करून हा प्रश्न प्राधान्याने मांडला होता.

सिडकोने सुरुवातीला बंगलो व रो-हाऊस उभारणीसाठी प्लॉटची विक्री केली होती. त्यानंतर काही ठिकाणी बदलत्या गरजांचा विचार करून बहुनिवासी इमारती उभारण्यास परवानगी देण्यात आली होती. मात्र नगरविकास विभागाने सिडकोचा हा निर्णय रद्द करून अशा परवानग्यांवर स्थगिती आणली. परिणामी, परवानगी रद्द झाल्यामुळे आणि त्यातच अनेक इमारती मोडकळीस आल्याने व हस्तांतरण प्रक्रिया देखील ठप्प झाल्याने हजारो रहिवाशांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता आणि नवी मुंबईतील शेकडो सोसायट्यांमधील हजारो कुटुंबांवर त्याचा परिणाम झाला होता. त्यामुळे या गंभीर परिस्थितीची दखल घेत प्रभावित रहिवाशांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे न्याय मिळवून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडको प्रशासन व शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. त्या अनुषंगाने दि. १२



मार्च २०२६ पार पडलेल्या सिडकोच्या संचालक मंडळाच्या बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये वास्तव परिस्थितीचा विचार करून अखेर धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे अडकलेल्या प्रकरणांना मार्ग मोकळा होणार असून संबंधित हजारो रहिवाशांना दिलासा मोठा मिळाला आहे.

संचालक मंडळाच्या बैठकीत या विषयानुषंगे झालेल्या सविस्तर चर्चेनुसार ज्या प्रकरणांमध्ये प्लॉटधारकांनी नियोजन प्राधिकरणाची आवश्यक परवानगी घेऊन बहुनिवासी इमारती बांधल्या आहेत, त्या सर्व प्रकरणांना कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारता नियमित मान्यता (डीम्ड रेग्युलरायझेशन) देण्यात येणार आहे. तसेच, ज्या ठिकाणी परवानगीशिवाय बहुनिवासी इमारती उभारण्यात आल्या आहेत, त्या प्रकरणांचे नियमितीकरण दंडात्मक शुल्क भरून केले जाणार आहे. यामध्ये निवासी वापरासाठी प्लॉट क्षेत्रफळाच्या राखीव किमतीच्या २५ टक्के, तर व्यावसायिक वापर असलेल्या प्रकरणांसाठी १५० टक्के एकरकमी शुल्क आकारले जाणार आहे. नियमितीकरणानंतर संबंधित घरांना स्वतंत्र युनिट म्हणून मान्यता देण्यात येईल. त्यामुळे मालमत्तेचे हस्तांतरण, गहाण ठेवणे (मॉर्गेज) आणि बँक व्यवहार सुलभ होणार आहेत. दरम्यान, विद्यमान इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी (रिडेव्हलपमेंट) प्रथम नियमितीकरण आवश्यक राहील. त्यानंतर प्रचलित

> **"हा निर्णय केवळ तांत्रिक नसून हजारो कुटुंबांच्या हक्कांशी संबंधित आहे. नियमितीकरणामुळे नागरिकांना त्यांच्या मालमत्तेवरील पूर्ण अधिकार मिळतील तसेच पुनर्विकास व आर्थिक व्यवहारांतील अडथळे दूर होतील. नवी मुंबईतील अशा सर्व प्रलंबित प्रश्नांवर न्याय मिळवून देण्यासाठी मी पुढेही सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे".**
>
> **- आमदार प्रशांत ठाकूर**

यूडीसीएपीआर/ डीसीआर नियमांनुसार पुनर्विकासास परवानगी दिली जाईल. पुढे या प्लॉटचा वापर निवासी स्वरूपातच मानला जाणार आहे. याशिवाय, भिन्न मालकांचे बंगलो किंवा रो-हाऊस प्लॉट एकत्र करून (अमलगमेशन) विकास करण्यासही सिडकोने प्रोत्साहन दिले आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्याचे अधिकार सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले असून, कार्यवृत्ताच्या पुष्टीची प्रतीक्षा न करता हा निर्णय लागू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे नवी मुंबईतील प्रलंबित प्रकरणांना गती मिळणार असून, रहिवाशांच्या मालकी हक्क, पुनर्विकास आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे दीर्घकाळ अडकलेल्या प्रकरणांना गती मिळणार असून, नागरिकांच्या मालकी हक्क, पुनर्विकास आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित अडचणी मोठ्या प्रमाणात दूर होणार आहेत.

या निर्णयाचे स्थानिक नागरिकांनी स्वागत केले असून, आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांबद्दल तसेच सिडको प्रशासनाबद्दल समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



**महाराष्ट्र राज्याचे मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर (पनवेल) निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर आदी उपस्थित होते. ( दैनिक युवक आधार )**

## माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी घेतले श्री दत्तप्रभू श्री रेणुका मातेचे दर्शन

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरप्रतिनिधी सय्यद ईसा :** महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री नामदार अशोकरावजी चव्हाण यांनी अचानकपणे माहूर गडावरील श्री दत्तशिखर संस्थान गाठून श्री दत्तप्रभूंचे दर्शन घेत महंत श्री प पू मधुसूदनजी भारती महाराज यांचे दर्शन घेऊन तब्येतीची विचारपूस करत श्री दत्तप्रभू श्री रेणुका माता चरणी जगात सुख शांती समृद्धी नांदू दे अशी प्रार्थना केली

यावेळी श्री दत्त शिखर संस्थान येथे श्याम भारती महाराज यांनी अशोकराव चव्हाण यांचा सत्कार केला तर श्री रेणुका देवी संस्थान येथे विश्वस्त तथा पुजारी चंद्रकांत भोपी यांनी सत्कार मातेचा महाप्रसाद दिला यावेळी श्री दत्त शिखर संस्थान सह रेणुका माता संस्थान वर सुरू असलेल्या विकास कामांचा त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता विशाल चोपडे उपविभागीय अभियंता डि के भिसे यांच्याकडून आढावा घेतलायावेळी माजी मुख्यमंत्री अशोकराव यांचे सोबत माजी आमदार अमरनाथ राजुरकर भाजपाचे ज्येष्ठ नेते गोविंदराव पाटील



नागेलीकर महापौर कविताताई मुळे ज्येष्ठ नेते नामदेवरावजी केशवे प्रवीण साले संजय देशमुख लहानकर निलेश पावडे किशोर भवरे नगराध्यक्ष फिरोज दोसानी भाजपाचे तालुका अध्यक्ष निळू भाऊ मस्के माजी नगराध्यक्ष प्रा राजेंद्र केशवे डॉ निरंजन केशवे संजय भाऊ राठोड अनिल वाघमारे कांतराव घोडेकर नगरसेवक गोपू भाऊ महामुने हाजी उस्मान खान पठाण किशोर भाऊ जगत विनायक मुसळे अपील बेलखोडे विजय आमले नंदकुमार जोशी सर सय्यद रहमत अली दिलीप मुनगिलवार रामकिसन केंद्रे अजय पवार यांचे सह एमआयएमचे युवा नेते इरशाद भाई मकरानी यांनी भेट घेऊन सत्कार केला यावेळी नातंह कैलास जेठे पोनी देविदास चोपडे अधिकारी कर्मचारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिगवण बाजारपेठेत हापूस आंब्याचे आगमन; पहिली पेटी तब्बल १४ हजारांना विक्री

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी अरुण भोई**

**भिगवण :** भिगवण येथील बाजारपेठेत रत्नागिरी-देवगड हापूस आंब्याच्या पेट्यांचे आगमन झाले असून, यंदा तब्बल एक महिना उशिराने हापूस दाखल झाल्याने आंबाप्रेमींमध्ये उत्सुकता वाढली आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांमध्ये हापूस आंबा लवकर उपलब्ध होत असला, तरी ग्रामीण भागात तो उशिरा येत असल्याचे चित्र यावेळीही दिसून आले.




फळांचा राजा म्हणून ओळख असलेल्या हापूस आंब्याला यंदा हवामानातील बदलांचा मोठा फटका बसला आहे. नोव्हेंबरपर्यंत झालेल्या पावसामुळे कलमांना उशिरा पालवी फुटली, मोहरही उशिरा आला. त्यानंतर पडलेल्या कडाक्याच्या थंडी व धुक्यामुळे मोहरावर परिणाम झाला. तसेच थ्रिप्सच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे. सुरुवातीला ८० ते ९० टक्के मोहर लागला असला तरी प्रत्यक्षात यंदा केवळ २० टक्केच उत्पादन उपलब्ध होणार असल्याची माहिती गणपतीपुळे (मालगुंड) येथील बागायतदार विद्याधर पुसाळकर यांनी दिली.

दरम्यान, भिगवण येथील आंबा व्यावसायिक संतोष सोनवणे यांच्या दुकानात हापूस आंबा पेटी पूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी पहिली पेटी तब्बल १४,००० रुपयांना ज्योती हॉटेलचे चंद्रशेखर पवार यांनी खरेदी केली. दुसरी पेटी डॉ. संजय भोसले, तिसरी पेटी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती पराग जाधव, चौथी पेटी दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक रामदास झोळ, पाचवी पेटी पंचरत्न हॉटेलचे अविनाश गोलांडे, तर सहावी पेटी महेंद्र भोगावत यांनी समान दरात खरेदी केली.पेटीचे पूजन चंद्रशेखर पवार, पराग जाधव, सरपंच गुरप्पा पवार, जवाहर रायसोनी, तुकाराम बंडगर, बापूराव थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी परिसरातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत चवरे यांनी केले.

## “पनवेलमध्ये सौर प्रकल्प निर्मिती व आधुनिक महिला सुविधा केंद्र उभारा- ममता प्रितम म्हात्रे”

### पनवेल महानगरपालिकेत महिला सन्मान स्वच्छता अभियान व सौर ऊर्जा प्रकल्पाबाबत महत्त्वपूर्ण प्रस्ताव सादर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** – पनवेल महानगरपालिका क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी आज महापौरांकडे दोन महत्त्वपूर्ण व दूरदृष्टीपूर्ण प्रस्ताव निवेदनाद्वारे सादर केले.यामध्ये “महिला सन्मान स्वच्छता अभियान” अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अत्याधुनिक पिंक टॉयलेट्स (महिला सुविधा केंद्र) उभारण्याचा व्यापक प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. ही केंद्रे केवळ सार्वजनिक स्वच्छतागृह नसून महिलांच्या सुरक्षितता, आरोग्य व सन्मान लक्षात घेऊन विकसित केलेली बहुउद्देशीय सुविधा केंद्रे असतील.या पिंक टॉयलेट्समध्ये आधुनिक व स्वच्छ शौचालयांसोबतच सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन, वापरलेल्या नॅपकिन्सच्या सुरक्षित विल्हेवाटीसाठी इन्सिनरेटर, तसेच स्तनपान करणाऱ्या मातांसाठी स्वतंत्र ‘हिरकणी कक्ष’ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने केंद्रांच्या बाह्य भागात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात येईल तसेच २४ तास महिला रक्षकांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव आहे.

या सुविधा केंद्रांमध्ये सौर ऊर्जा (Solar Power) वापर, पावसाच्या पाण्याचे संकलन (Rainwater Harvesting) आणि आपत्कालीन




परिस्थितीत तत्काळ मदत मिळण्यासाठी पॅनिक बटण (Emergency Alarm) यांसारख्या स्मार्ट सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे.शहरातील प्रमुख वर्दळीची ठिकाणे जसे की रेल्वे स्थानके, बाजारपेठा, बस स्थानके, उद्याने व शासकीय कार्यालय परिसर येथे पहिल्या टप्प्यात २५ ते ५० पिंक टॉयलेट्स उभारण्याचा आराखडा सादर करावा अशी मागणी केली आहे. या प्रकल्पासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तसेच विविध उद्योगांच्या CSR निधीचा वापर करून महापालिकेवरील आर्थिक भार कमी ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या केंद्रांचे व्यवस्थापन स्थानिक महिला स्वयं-सहायता गटांकडे (Self Help Groups) देऊन महिलांना रोजगाराच्या संधी

> **““आदरणीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या ‘मन की बात’ मधून नैसर्गिक ऊर्जास्रोतांना दिल्या जाणाऱ्या प्राधान्याच्या धर्तीवर, असे स्मार्ट व शाश्वत प्रकल्प पनवेलमध्येही राबविणे ही काळाची गरज आहे. पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सौ.ममता म्हात्रे यांनी मांडलेले महिला सन्मान स्वच्छता अभियान आणि सौर ऊर्जा प्रकल्प हे अत्यंत दूरदृष्टीपूर्ण आणि लोकहिताचे प्रस्ताव आहेत. महानगरपालिकेने या प्रस्तावांचा गांभीर्याने विचार करून त्यांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी आमची अपेक्षा आहे.”**
>
> **— प्रितम जनार्दन म्हात्रे**
> **भाजप नेते, पनवेल**

उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रमही या योजनेत समाविष्ट आहे.या उपक्रमामुळे महिलांच्या आरोग्याशी संबंधित समस्या कमी होण्यास मदत होणार असून पनवेल शहर अधिक सुरक्षित, स्वच्छ व महिलांसाठी अनुकूल शहर म्हणून विकसित होण्यास मोठी चालना मिळणार आहे. तसेच राष्ट्रीय सौर ऊर्जा अभियान व हरित ऊर्जा धोरण अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंकुलांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबतही विस्तृत प्रस्ताव सादर करण्यात आला. या प्रकल्पाद्वारे सोसायटी स्तरावर वीज निर्मिती, कॉमन सुविधांसाठी ऊर्जा पुरवठा, इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधा तसेच नेट मीटरिंगचा वापर यांचा समावेश करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे नागरिकांच्या वीज खर्चात बचत होऊन पर्यावरणपूरक ऊर्जेला चालना मिळणार आहे.या दोन्ही प्रकल्पांसाठी PPP (Public-Private Partnership) व CSR निधीचा वापर करण्याचा प्रस्ताव असून, स्थानिक महिला बचत गटांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावरही विशेष भर देण्यात आला आहे. सौ. ममता म्हात्रे यांनी या प्रस्तावांमुळे पनवेल शहरात महिला सुरक्षा, स्वच्छता व हरित ऊर्जेच्या क्षेत्रात मोठी प्रगती होऊन शहर “मॉडेल सिटी” म्हणून विकसित होईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच संबंधित विभागांना सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून हे प्रकल्प तातडीने राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

# श्री छत्रपती शिक्षण संस्थेचा 66 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : भवानीनगर (ता.इंदापूर) येथील श्री छत्रपती शिक्षण संस्थेचा 66 वा वर्धापन दिन श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पृथ्वीराज बापू जाचक व सचिव दत्ताराम रामदासी यांच्या सूचनेनुसार सर्व शाखांमध्ये वर्धापन दिनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री छत्रपती हायस्कूल काटेवाडीचे माजी मुख्याध्यापक मा.श्री. चंद्रशेखर निंबाळकर सर होते. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी त्यांनी आपल्या मनोगतात संस्थेचा इतिहास विद्यार्थ्यांना सांगितला.




महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शिवाली माने देशमुख,कार्यालयीन अधीक्षक सुशील निंबाळकर, प्रा.हुंबे सर,प्रा.वानखेडे मॅडम,प्रा. वाघमारे मॅडम,प्रा. चांदगुडे मॅडम,प्रा.चव्हाण सर,प्रा. काळभोर सर, दुरगुडे सर,प्रा. भोईटे सर, प्रा.काटे मॅडम,प्रा. थोरात मॅडम,प्रा.सपकळ मॅडम,प्रा. रणसिंग मॅडम, प्रा. दिघे मॅडम,प्रा. होरणे मॅडम तसेच गणेश क्षीरसागर, रविंद्र सुतार, वर्षा कुलकर्णी यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमात संस्थेच्या कार्याचा आढावा घेण्यात आला व विद्यार्थ्यांना संस्थेच्या परंपरेची ओळख करून देण्यात आली. वर्धापन दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करून वातावरण उत्साहपूर्ण झाले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. होरणे मॅडम तर आभार प्रा. सपकळ मॅडम यांनी केले.

# पंचायत समितीची आमसभा नव्हे उद्धव गटाचा 'दरबार'

## भाजपचे नकुल सोनटक्के संतापले, पालकमंत्र्यांकडे तक्रार

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे/ तालुका प्रतिनिधी**

**दर्यापूर** दर्यापूर : दर्यापूर पंचायत समितीची वार्षिक आमसभा म्हणजे शेतकरी, ग्रामपंचायती आणि सामान्य नागरिकांच्या विकासाच्या प्रश्नांची मांडणी होणारे एक महत्त्वाचे प्रशासकीय व्यासपीठ. मात्र या पवित्र व्यासपीठाचे रूपांतर उद्धव ठाकरे गटाच्या राजकीय दरबारात झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. शासकीय बैठकीच्या स्टेजवर एका विशिष्ट पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना स्थान देण्यात आल्याने या बैठकीचे प्रशासकीय स्वरूपच प्रश्नचिन्हांकित झाले आहे. यावरून आक्रमक होतं भाजपचे अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी या आमसभेवर आक्षेप घेत प्रशासकीय प्रमुखांची पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे तक्रार केली आहे. तर उद्धव ठाकरे गटावरही त्यांनी टीका केली आहे.

आमदार गजानन लवटे यांच्या अध्यक्षतेखाली आणि गटविकास



अधिकारी चंदू धवक यांच्या उपस्थितीत ही आमसभा संपन्न झाली. मात्र बैठकीचे प्रशासकीय स्वरूप बाजूला पडून व्यासपीठावर उद्धव ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची रांग लागल्याने विरोधकांचा संताप उफाळून आला. चक्क प्रशासकीय प्रमुख असलेल्या गटविकास अधिकाऱ्यांना मागच्या लाईंचा रस्ता दाखविण्यात आल्याने आता यावर टीका होऊ लागली आहे.

**शासकीय व्यासपीठाचे राजकीय अपहरण, नकुल सोनटक्के यांचा हल्लाबोल**

भाजपचे अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी या प्रकाराचा तीव्र शब्दांत निषेध केला. ते म्हणाले की पंचायत समितीची आमसभा ही शासकीय बैठक आहे — तेथे कोणत्याही एका पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना सन्मानाचे स्थान देणे म्हणजे सरकारी यंत्रणेचा उघड राजकीय वापर आहे. जनतेच्या करातून चालणाऱ्या प्रशासकीय बैठकीचे रूपांतर उद्धव गटाच्या प्रचार सभेत करणे हे कायद्याने आणि नैतिकतेने चुकीचे असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. सोनटक्के यांनी या प्रकरणी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

तर या प्रकरणाने अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. शासकीय बैठकीत विशिष्ट पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना व्यासपीठावर स्थान देण्याचा निर्णय कोणी घेतला? गटविकास अधिकाऱ्यांनी हा प्रकार का थांबवला नाही? आणि सर्वात महत्त्वाचे — पंचायत समितीची आमसभा नक्की कोणासाठी होती, जनतेसाठी की एका पक्षाच्या राजकीय प्रदर्शनासाठी? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**पालकमंत्र्यांकडून कारवाईची अपेक्षा**

भाजपने पालकमंत्र्यांकडे तक्रार केल्यानंतर आता या प्रकरणावर काय कारवाई होते, याकडे दर्यापूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

शासकीय यंत्रणेचा राजकीय वापर हा गंभीर विषय असून त्यावर ठोस कारवाई न झाल्यास हे प्रकार वारंवार होत राहतील, असा इशाराही भाजप कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# राहुल संगितराव हजारे यांच्या मागणीला यश ; आदरणीय पालकमंत्री मा . श्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्या पत्राचा परिणाम

**दैनिक युवक आधार**

**नांदगाव खंडेश्वर प्रदिप रघुते :** नांदगाव खंडेश्वर परिसरातील मुख्यत्वे येणस व टोंगलाबाद , बग्गी. जवळा.राजुरा, वाई, बोरी, निंबा, किरजवळ, धोतरा, इत्यादी गावातून नांदगाव खंडेश्वर येथे शिक्षणाकरिता येणाऱ्या चिमुकल्या पासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत शेकडो विद्यार्थी हे ये जा करीत असतात मात्र सकाळच्या सत्रात परिसरातून नांदगावकरिता बस उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना प्रवास समस्या निर्माण होत होती या गंभीर समस्येची दखल घेऊन टोंगलाबाद येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल संगीतराव हजारे यांनी अथक परिश्रम घेत अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री आदरणीय मा.श्री. चंद्रशेखर



बावनकुळे साहेब यांच्याशी पत्रव्यहार करून राज्य परिवहन मंडळाला सदर वेळेत परिसरातून नांदगाव खडेश्वर करिता बस सुरू करण्यास भाग पाडले.

शैक्षणिक सत्र संपत असले तरी सदर बस सुरू केली. असल्याचा आनंद विद्यार्थी वर्गात व्यक्त होत असून सदर बस निरंतर सुरू राहावी अशी मागणी सुद्धा होत आहे सदर बस सुरू करण्यास राहुल संगितराव हजारे संस्थापक स्वराज्य प्रशासकीय अकॅडमी नांदगाव खंडेश्वर यांनी केलेले प्रयास आणि त्यांचे प्रयत्नांना पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्याकडून मिळालेला प्रतिसाद याबाबत विद्यार्थी आभार व्यक्त करीत आहे..


शैक्षणिक क्षेत्रात नांदगाव खंडेश्वर किंगचे भूमिकेत एसटी प्रशासन नांदगाव खंडेश्वर तालुक्याला महत्व देत नसले तरी त्यामुळे नांदगाव खंडेश्वर शहराचे शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्व कमी करता येत नाही डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचा जन्म झालेल्या नांदगाव तालुक्यात तब्बल आठ महसूल मंडळाचा विस्तार हसून येथील नांदगाव हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे हजारो विद्यार्थी प्रवेशित असतात तसेच एकलव्य, एस.ओ.एस. के. गुरुकुल, अभिनव , वाय. ई. एस. रामराव भोयर. हायस्कूल .जाकीर हुसेन उर्दू .आयटीआय .सह राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय , अनेक विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे शैक्षणिक कार्याचा भार उचलत असुन हि बस चादुर वरुन सकाळी 5.45 ला सुटत असल्याचे मत श्री. जयंत झाडे.आगार व्यवस्थापक. निलेश भगत सहाय्यक वाहतुक अधिक्षक..यांचे पालक व विद्यार्थी यांचे कडुन कौतुकाचा वर्षाव होत आहे .तसेच नांदगाव खंडेश्वर चे दैनिक युवक आधार चे पत्रकार प्रदिप रघुते तसेच राजुरा येथिल विलास भुजाडे.राजेश अजमिरे. सुनिल देशमुख.प्रकाश बांडाबुचे चंदुभाऊ देशमुख यांनी एस टी बस चालक यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला..

# श्री क्षेत्र श्रद्धासागर आकोट येथे सातवे अ.भा.वऱ्हाडी साहित्य संमेलन !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ आकोट (अकोला) प्रतिनिधी :** वऱ्हाडी साहित्य व बोलीभाषा संवर्धन संस्था बार्शीटाकळी द्वारा संचालित अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंच अकोला यांच्या सातव्या अ.भा. वऱ्हाडी साहित्य संमेलनाची अधिकृत घोषणा मंचाचे अध्यक्ष श्याम ठक यांच्या वतीने करण्यात आली. अकोट येथे सातवे अ.भा. वऱ्हाडी साहित्य संमेलन घेण्यात येणार आहे. वऱ्हाडी साहित्य व बोलीभाषा संवर्धनासाठी गेल्या २०१५ पासन कार्य करत असलेल्या संस्थेचे वर्षभर वेगवेगळे उपक्रम सुरू असतात. त्यामध्ये विविध प्रकारच्या काव्यलेखन स्पर्धा, दिवाळीत अस्सल वऱ्हाडी दिवाळी अंक म्हणून चिरांगनचे प्रकाशन यांचा समावेश आहे.

वऱ्हाडी मायबोलीचा जागर व्हावा या हेतूने अ.भा.वऱ्हाडी साहित्य संमेलनाचे आयोजन केल्या जाते. आतापर्यंत सहा




अ.भा. वऱ्हाडी साहित्य संमेलने पार पडली आहेत. सातवे अ.भा. वऱ्हाडी साहित्य संमेलन दि.१२ एप्रिल २०२६ रविवार रोजी अकोट येथील श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे होणार आहे.

या संमेलनाला अध्यक्षा ख्यातनाम वऱ्हाडी साहित्यिका सौ. साधना काळबांडे तर स्वागताध्यक्ष म्हणून श्रीक्षेत्र श्रद्धासागरचे अध्यक्ष हभप वासुदेव महाराज महल्ले यांची निवड करण्यात आली.

या संमेलनाचे उदघाटन सुप्रसिद्ध समाजसेवक तथा लोकजागर मंचचे अनिल गावंडे यांच्या हस्ते होणार आहे. सदर संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून हभप शुकदास महाराज गाडेकर राष्ट्रीय किर्तनकार श्री. गुरुदेव सेवाश्रम पाटसुल, शिक्षण क्षेत्रात नामवंत असलेले गजानन नारे, डॉ प्रा. ममता इंगोले, प्रा. राजेश मिरगे, पूर्व संमेलनाध्यक्ष तुळशीराम बोबडे, पुष्पराज गावंडे, माजी सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ उपस्थित राहणार आहेत. वऱ्हाडी बोलीभाषेवर प्रेम करणाऱ्या सर्वांनी संमेलनाला उपस्थित राहण्याचे संमेलनाचे कार्याध्यक्ष प्रकाश गायकी व अध्यक्ष श्याम ठक यांनी आवाहन केले आहे.

# अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांच्या फार्मर आय .डी .वर तहसील कार्यालयाची हलगर्जी ; मनसे ने तहसीलदारांना लेखी पत्र देऊन कारवाईची मागणी केली

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे /अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांना शासकीय योजनांपासून वंचित ठेवण्याचे काम तहसीलदार कार्यालय करीत आहे का? गेल्या ८-९ महिन्यांपासून ऑनलाइन आवेदन करूनही हजारो शेतकऱ्यांना 'फार्मर आय.डी.' मिळाले नाही. परिणामी, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवता येत नाही, तर २०२५ च्या नैसर्गिक आपत्ती नुकसानीसाठीही भरपाई मिळवण्यात अडचणी आल्या. महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) शॅडो कैबिनेट सदस्य व जिल्हाध्यक्ष, माहिती अधिकारी संघर्ष समिती देवव्रत



विष्णू पाटील यांनी आज (३० मार्च २०२६) तहसीलदार अलिबाग विक्रम पाटील यांना लेखी पत्र देत या प्रकरणात दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची व सर्व शेतकऱ्यांना तात्काळ ओळखपत्र वितरण करण्याची मागणी केली आहे.देवव्रत पाटील यांनी सांगितले की, अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांनी ऑनलाइन प्रक्रियेद्वारे 'फार्मर आय.डी.'साठी अर्ज केले असली तरी तहसीलदार कार्यालयाकडून प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. यामुळे शेतकऱ्यांना शासकीय अनुदान, विमा, नुकसान भरपाईसह इतर लाभ मिळवता येत नाहीत. विशेषत: २०२५ मध्ये पावसाळ्यात झालेल्या नुकसानीसाठी ज्या शेतकऱ्यांना भरपाई मिळणार होती, त्यांना 'फार्मर आय.डी.' नसल्याने अतिरिक्त कागदपत्रांची पूर्तता करावी लागली. तलाठी व तहसीलदार कार्यालयांना अनेकदा भेटी देऊनही ओळखपत्र मिळाले नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना शारीरिक-मानसिक त्रास सहन करावा लागला व आर्थिक नुकसान झाले.हलगर्जीपणाला परवानगी नाही!महाराष्ट्र नवनिर्माण सेना नेहमीप्रमाणे शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढते. देवव्रत पाटील म्हणाले, "तहसीलदार कार्यालयातील हलगर्जीपणा शेतकऱ्यांच्या खायच्या पायी पाणी पाडतोय. कामात दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी. तात्काळ सर्व प्रक्रिया पूर्ण करून प्रत्येक शेतकऱ्याला 'फार्मर आय.डी.' द्यावे, अन्यथा मनसे आंदोलन छेडेल!" माहिती अधिकार संघर्ष समितीमार्फतही हे पत्र देण्यात आले असून, शासनाने या प्रकरणाला गंभीरतेने घ्यावे, अशी मागणी देवव्रत पाटील यांनी केली आहे. अलिबाग तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात या प्रकरणाने त्रस्त आहेत. तहसीलदार कार्यालयाने आता तरी झोपेच्या गोळ्यांपासून सावध होऊन कारवाई करावी, अन्यथा शेतकऱ्यांचा रोष वाढेल!

# सोयगावात भव्य हिंदू संमेलन; एकजुटीचा संदेश, सामाजिक संवादावर भर

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे** : सोयगाव- येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने विविध जाती,पंथ आणि सामाजिक संघटनांच्या सहभागातून भव्य हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला परिसरातील हजारो नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.संमेलनात प्रमुख वक्ते म्हणून आशुतोष झा यांनी मार्गदर्शन करताना समाजात ऐक्य आणि परस्पर समन्वयाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी इतिहासातून प्रेरणा घेण्याची गरज व्यक्त करत सामाजिक एकात्मता टिकवण्यासाठी जागरूक राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विविध संत-महंत आणि मान्यवरांची उपस्थिती होती.पाल येथील संत गोपाल चैतन्य बाबाजी,गिरनारी मठाचे स्वामी ब्रह्मानंद,मथुरा येथील वात्सल्य आश्रमाच्या सारिका ताई मिसाळ, जान्हवीताई सोनवणे (माता यशोदा) तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गोरक्षनाथ आबुज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.गोरक्षनाथ आबुज यांनी संमेलनाचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, समाजातील सकारात्मक आणि नकारात्मक




पैलूंवर विचार करून एकत्र येणे हे या उपक्रमाचे ध्येय आहे.स्वामी ब्रह्मानंद यांनी धर्म,अर्थ,काम आणि मोक्ष या सनातन मूल्यांचे महत्त्व पटवून दिले.

सारिका ताई मिसाळ यांनी कुटुंबातील संवाद वाढवण्यावर भर देत तरुण पिढीने जागरूक राहण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला सामूहिक हनुमान चालीसा पठण आणि दीपप्रज्वलन करण्यात आले, तर शेवटी वंदे मातरम्ने समारोप झाला.या संमेलनाचे प्रास्ताविक कल्पेश जोशी यांनी सादर केले,सूत्रसंचालन हर्षल हिंदू यांनी केले आणि आभार प्रदर्शन सुधन्वा केणेकर यांनी केले.एकूणच,या संमेलनातून सामाजिक ऐक्य परस्पर संवाद आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करण्याचा संदेश देण्यात आला.

# विठ्ठलराव चाटे इंग्लिश स्कूल, तांबवा येथील विद्यार्थ्यांचे ऑलिम्पियाड परीक्षेत उज्ज्वल यश

**दैनिक युवक आधार**

**केज प्रतिनिधी :** तांबवा (ता. केज, जि. बीड) येथील विठ्ठलराव चाटे इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांनी जनरल नॉलेज ऑलिम्पियाड परीक्षा (जागतिक सामान्य ज्ञान परीक्षा) 2025-26 मध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. या परीक्षेत शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळवत सुवर्णपदक व विशेष प्राविण्य प्राप्त केले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात शाळेचे कौतुक होत आहे.या स्पर्धेत इयत्ता तिसरी ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. कठोर परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचा मान वाढवला. अनेक विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदक मिळवत आपली बुद्धिमत्ता आणि मेहनत सिद्ध केली.शाळेच्या संचालक अजयजी चाटे सर यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना लहानपणापासून स्पर्धा परीक्षांची ओळख व्हावी आणि त्यांच्यात सामान्य ज्ञान वाढावे यासाठी शाळेत विविध स्पर्धा व उपक्रम राबवले जातात. त्याचाच परिणाम म्हणून विद्यार्थ्यांनी या ऑलिम्पियाड परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे.या यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने कौतुक करण्यात आले असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक, पालक आणि शाळा व्यवस्थापनाचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विठ्ठलराव चाटे इंग्लिश स्कूल, तांबवा ही शाळा शैक्षणिक गुणवत्तेच्या बाबतीत नेहमीच पुढे असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# उन्हाळा तापू लागला पक्षांसाठी थोडे पाणी ठेवा !

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** आकाशात मोकळयावर फिरणाऱ्या मुक्या पक्षांना रणरणत्या उन्हाच्या झळा मोठ्या प्रमाणात सोसाव्या लागतात. आता उन्हाळा तापू लागला तेव्हा या मुक्या पक्षांना थोडे पाणी व अन्न देणे हे आपल्या मानवाचेकर्तव्य आहे.कारणते या सृष्टीचा भाग आहेत. त्यांचाही जीव अशा उन्हाळयाच्या तीव्रतेत वाचणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येकाने पक्षासाठी अशी व्यवस्था करावी, त्यांची भूक व तहान फार छोटी आहे त्यांची पूर्तता करावी, अशी आग्रही मागणी पक्षी मित्राकडून करण्यात आली आहे.उन्हाळा आता कमालीचा



जाणवू लागला आहे, मानवाला देखील उन्हाळयाचे चटके बसू लागले आहेत. तर लहानग्या पक्ष्यांचे काय हाल होत असतील हे आपण समजू शकतो. सध्या कडक उन्हाची तीव्रता दिवसागणिक वाढत असून, प्रत्येकाने पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करावी, असे आवाहन पक्षीमित्रां कडूनकेले जात आहे.उन्हाळयात पिण्याच्या पाण्यासाठी व दोन दाण्यासाठी पक्ष्यांची होणारी भटकंती थांबविण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी पक्षासाठी पाणी व अन्न याची तरतूद करावी. या साठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.दिवसेंदिवस होणारी वृक्षतोड ,सिमेंटचे रस्ते, त्यात मोबाइल चे वाढते जाळे, यामुळे पक्ष्यांची संख्या कमालीची घटली आहे. पक्षी हा निसर्ग चक्रातील एक महत्वाचा घटक असून, त्यांचे वाचणे आवश्यक आहे. हे आपल्या मानव जातीचे आद्य कर्तव्य आहे, तापत्या उन्हामुळे नाल्याचे, नदीचे, तथा साठवलेल्या पाण्याचे ठिकाणे कोरडे पडू लागले आहेत.

त्यांची पाण्यासाठी भटकंती ही साहजिकच आहे, त्यांची भटकंती टाळण्यासाठी नागरिकांनी पिण्याच्या पाण्याची व काही दाणे अन्नाची व्यवस्था करावी. उन्हाळा सुसह्य करण्यासाठी नागरिकांनी मुक्या पक्षासाठी घरावर, टेरेसवर, दारात झाडा खाली पाण्याची भांडी ठेवावीत, असे पक्षीमित्रांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे. सध्यस्थितीत पक्षी कमी होऊ लागले असून प्रत्येकाने जबाबदारी ओळखून राहत्या घरी, जमेल या ठिकाणी पक्षाच्या दाना-पाण्याची सोय करणे गरजेचे आहे. नागरिकांनी मानवतावादी दृष्टिकोनातून अंगणात,झाडाखाली, घराच्या टेरेसवर, घरावर ,कम्पाउंड वॉलवर आदी ठिकाणी पाण्याचे भांडे व थोडे दाणे अन्न ठेवणे गरजेचे आहे.

## "कंकरवाडीमध्ये विधी साक्षरतेची ज्योत; ग्रामशिबिरात कायदे व योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन"

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** रिसोड (वाशीम)२९ मार्च रिसोड तालुक्यातील कंकरवाडी येथे विधी साक्षरता व जागरूकता ग्रामशिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. विविध कायदे, शासकीय योजना तसेच नागरिकांच्या हक्कांविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आल्याने गावकऱ्यांमध्ये मोठी जागरूकता निर्माण झाली.

यशदा, पुणे व न्याय विभाग, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिराचे आयोजन जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात करण्यात आले. सरपंच प्रशासक लक्ष्मी नामदेव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. राज्य ग्रामीण विकास यंत्रणा (यशदा) पुणेचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी व संचालक डॉ. रामप्रसाद पोले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमास सेवानिवृत्त विस्तार अधिकारी भाऊराव बेलखेडकर, ॲड. अनिल गवई, केव्हीके वाशिमचे डॉ. सुधीर देशमुख, प्रशिक्षक प्रभू कांबळे, संतोष चक्रनारायण तसेच ग्रामपंचायत अधिकारी संदीप ढंगारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिबिराच्या प्रारंभी उपस्थित महिला व नागरिकांना विधी साक्षरतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. त्यानंतर ॲड. अनिल गवई यांनी घरगुती हिंसाचार, हुंडाबळी, विधी सेवा प्राधिकरण तसेच




इतर महत्त्वाच्या कायद्यांबाबत सविस्तर माहिती दिली. भाऊराव बेलखेडकर यांनी कायदेविषयक मार्गदर्शन करत नागरिकांच्या समस्या कशा सोडवाव्यात यावर मार्ग दाखवला.

प्रभू कांबळे यांनी लोकन्यायालय व विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यपद्धतीबाबत जनजागृती केली. तर ग्रामपंचायत अधिकारी संदीप ढंगारे यांनी विविध शासकीय योजना, बालहक्क, संरक्षण कायदे याबाबत उपयुक्त माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुधीर देशमुख यांनी केले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी अभिषेक देशमुख, ग्राप सदस्य प्रयाग जाधव, प्रभूजी बोंडे, सुधाकर कोल्हे, अरुणा पडघान, अंगणवाडी सेविका, आशा सेविका तसेच ग्रामपंचायत कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. गावातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप ढंगारे यांनी केले तर आभार प्रदर्शन अभिषेक देशमुख यांनी मानले.

# कोनेक्स टर्मिनल कंपनीच्या वतीने आयोजित कोनेक्स प्रिमियर लिग-2026क्रिकेट स्पर्धा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील :** उरण, भेंडखळ येथे श्री. ठाणकेश्वर येथील भव्य मैदानावर कोनेक्स टर्मिनल कंपनीच्या व्यवस्थापकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वतीने आयोजित एकदिवसीय क्रिकेट सामन्यांचे आयोजन रविवार दिनाक 29 मार्च 2026 रोजी करण्यात आले होते. अत्यंत खेळी मेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या सामन्यांमध्ये 4 प्रमुख संघांनी सहभाग नोंदविला होता. सकाळी 9:30 वाजता सामन्याचे प्रमुख उद्घाटक श्री. रवि प्रसाद साहेब यांच्या शुभ हस्तेया क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी स्पर्धे मध्ये सहभाग घेणारे चार संघाचे उपस्थित होते.

या सामन्यांमध्ये 1) यलो वॉरियर्स (कर्णधार श्री. तेजस मानकामे) 2) रेड चॅलेंजर्स (कर्णधार श्री. तुषार ठाकूर) 3) व्हाइट वॉरियर्स (कर्णधार श्री. नटराज सॅलियन) आणि ब्ल्यू रॉयल्स (कर्णधार श्री. विनय तांडेल) या संघ प्रमुखांनी आप आपली संघासोबत अतिशय खेळी मेळीच्या वातावरणात आणि आपला




संघ निश्चित चांगली कामगिरी करेल या हेतूने आज क्रिकेट मैदान गाजविले.

या सामन्यात कंपनीच्या सर्व स्टाफ ने हिरारीने सहभाग घेतला.. यामध्ये इंपोर्ट, एक्सपोर्ट, एल.सी. एल, अकाउंट्स, बिलिंग, मुव्हमेंट, मार्केटिंग, तसेच यार्ड एक्झिक्युटिव पासून इलेक्ट्रिक आणि आय टी डिपार्टमेंट च्या सर्व खेळाडूंनी सहभाग घेतला होता. ज्या कर्मचाऱ्यांना कधी एक दुसऱ्या कर्मचाऱ्यांशी कधी बोलण्यास वेळ मिळत नव्हता त्यांना आज कंपनीच्या सर्व स्टाफ सोबत एकत्रित सामने खेळताना खूप आनंद झाला. आपण जरी वेग वेगळ्या डिपार्टमेंट मध्ये कार्यरत असलो तरी आपण आपल्या कंपनीच्या नावासाठी आज एकत्र खेळत असल्याची भावना सर्व कर्मचाऱ्यांच्या मनात दिसून आली. त्यामुळे व्यवस्थापकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्यात असणारी सहकार्याची भावना दिसून आली.

याक्रिकेट मालीकेत मॅन ऑफ द मॅच.1) मयुर पाटील (रेड चॅलेंजर्स),2) नितीन वाघमारे (ब्ल्यू रॉयल्स),3) साहिल पाटील (ब्ल्यू रॉयल्स),4) ऋषिकेश सुरवडे (व्हाइट स्ट्राईकर्स),5) तेजस म्हात्रे (रेड चॅलेंजर्स).क्षेत्र रक्षक- म्हणून.भूषण म्हात्रे (रेड चॅलेंजर्स), बॅट मॅन- रोहित घरत ( व्हाईट स्ट्राईकर्स), गोलंदाज साहिल पाटील ( रेड चॅलेंजर्स), तर मॅन ऑफ द सिरीज म्हणून मयूर पाटील (रेड चॅलेंजर्स).यांना गौरवीण्यात आले. मालिकेत प्रथम क्रमांक रेड चॅलेंजर्स टीम (कर्णधार: श्री. तुषार ठाकूर)तर व्दितीय क्रमांक व्हाईट स्ट्राईकर्स टीम (कर्णधार: श्री. नटराज सॅलियन)यांनी पटकाविला आहे.

उरण भेंडखळ येथे कोनेक्स टर्मिनल कंपनीच्या वतीने एक दिवसीय आयोजित कोनेक्स प्रिमियर लिग-2026क्रिकेट स्पर्धांसाठी ग्राम पंचायत आणि भेंडखळ ग्रामस्थ मंडळ यांनी. सामन्यांसाठी श्री. ठाणकेश्वर मैदान उपलब्ध करून दिले होते. कोनेक्स टर्मिनल कंपनीआणि सर्व क्रिकेट संघानी ग्राम पंचायत भेंडखळ आणि भेंडखळ ग्रामस्थ मंडळाचे आभार मानले या सामन्यांसाठी.. कंपनीच्या वतीने. रविप्रसाद सर, विनय तांडेल ,तेजस मानकामे, तुषार ठाकूर, नटराज सॅलियन, देव नाखवा, समीर घरत, दिपेश तांबोळी, रघु गौरव जैन, यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांनी काम पाहिले. तर या सामन्यासाठी गुण लेखक आणि पंच कमिटी म्हणून कंपनीच्या स्टाफ ने सहकार्य केले

# कासोळा येथे १ एप्रिलला 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'

### नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – तहसीलदार अभय मस्के यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**एम डी सूरोशे/महागाव : (यवतमाळ) :** महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान – टप्पा १' अंतर्गत महागाव तालुक्यात मंडळनिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. याच मालिकेतील पुढील शिबिर बुधवार, दि. १ एप्रिल रोजी कासोळा येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित करण्यात आले आहे.महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी




या शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून नागरिकांना 'सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी' अंतर्गत विविध सेवा एकाच दिवशी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.शिबिरात प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, ७/१२ व ८-अ उताऱ्यांतील त्रुटी दूर करणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क तसेच डिजिटल उतारे तात्काळ उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.


याशिवाय उत्पन्न, रहिवासी, जात व क्रीमीलेअर प्रमाणपत्रे, सामाजिक अर्थसहाय्य योजना, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, पीएम किसान तसेच तक्रार निवारण सेवा नागरिकांसाठी उपलब्ध राहणार आहेत.

महाभूमी पोर्टलवरून डाउनलोड केलेल्या क्यूआर कोडयुक्त डिजिटल ७/१२ उताऱ्यास कायदेशीर वैधता असल्याबाबत शिबिरात मार्गदर्शन व प्रात्यक्षिकही देण्यात येणार आहे. कासोळा व परिसरातील नागरिकांनी या शिबिरात मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार अभय मस्के यांनी केले आहे.

# परिक्षा काळात शाळा सोडून गुरूजी मतदारांच्या दारात

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** पाथरी/ शाळेमध्ये वार्षिक परिक्षांच्या कालावधी सुरू असताना निवडणूक विभागाकडून मतदार नोंदणी दुरुस्ती व अपेक्ष नोंदणीच्या कामासाठी गुरूजीना बीएलओ म्हणून नियुक्ती करण्यात आली या कामकाजामुळे विद्यार्थ्यांवर शैक्षणिक नुकसान होणार हे निश्चित विशेष म्हणजे पाथरी तालुक्यांत जिल्हा परिषदेच्या शाळेत आधीच गुरूजीची कमतरता आहे काही



शाळांमध्ये तर दोन किंवा तीन गुरूजी कार्यरत आहेत यामुळे अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे अशा परिस्थितीत गुरूजींना ही जबाबदारी देण्यात आल्याने शाळेचा कारभार सांभाळण्याची वेळ एक किंवा दोन गुरूजी वर येत आहे परिणामी विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर तसेच परिक्षेच्या तयारीवर परिणाम होत असल्याचे चिंता व्यक्त केली जात आहे परिक्षा काळात विद्यार्थ्यांना गुरूजींच्या अधिक मार्गदर्शनाची आवश्यकता असते मात्र गुरूजी निवडणूक कामात व्यस्त असल्याने विद्यार्थ्यांना पूरेसे शैक्षणिक मार्गदर्शन मिळत नाही त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती पालकांकडून व्यक्त होत आहे

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने बळवंत राठोड यांचा गौरव

**जिल्हा प्रतिनिधी हिंगोली विजय खुडे :** शिक्षण क्षेत्रातील निस्पृह सेवा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत, बळवंत राठोड सर जिल्हा परिषद शाळा पिंपरी यांना यंदाच्या ध्येय एज्यूकेशन फाउंडेशन 'महाराष्ट्र यांचे कडून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारा'ने पुणे येथे जागतिक स्तरावर जिल्हा परिषद शाळेचे नाव कोरणारे श्री दत्ता वारे गुरुजी यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी ध्येय एज्युकेशन संस्थेचे प्रमुख सुदाम शेंडगे समवेतच अर्चना शेंडगे पिंपरी चिंचवडच्या उपमहापौर बाबर मॅडम तसेच शिक्षणाधिकारी गटशिक्षणाधिकारी व विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

बळवंत राठोड सरांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत शिक्षणाला केवळ पुस्तकी न ठेवता, ते ज्ञानार्जन आणि संस्कारांचे माध्यम कसे ठरेल, यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी केलेले उपक्रम आणि समाजातील



घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे. राज्यस्तरावरील या प्रतिष्ठेच्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या सहकाऱ्यांनी, विद्यार्थ्यांच्या पालकांनी आणि विविध शिक्षणप्रेमी संघटनांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. "हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून, माझ्या सर्व विद्यार्थी आणि सहकाऱ्यांचा आहे," अशी विनम्र प्रतिक्रिया राठोड सरांनी व्यक्त केली. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# प्रा शा देवनांद्रा सा.का.प शाळेने आयोजित केला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील गुणवत्तेबाबत नामांकित जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवनांद्रा सा.का.प शाळेने तालुक्यातील 9 नवोदय पात्र गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शा.व्य.स.चे अध्यक्ष बळीरामजी गायकवाड हे होते. सत्कार समारंभासाठी प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी वक्ते डॉ.केशव खटिंग सर व डॉ. दिलीप शृंगारपुतळे हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना नवोदय परीक्षेला कसे सामोरे जायचे व त्यामागील यशाचे गमक काय आहे याबाबत महत्त्वाचे मार्गदर्शन केले. विशेष उपस्थिती म्हणून जि.प.परभणीचे माजी शिक्षण सभापती माननीय दादासाहेब



टेंगसे काका, प.स.पाथरी चे सभापती श्रीमती.सुनीता गजेंद्र डुकरे,उपसभापती श्री.सचिन अंभुरे, प.स.सदस्य भगवान दुगाणे,सौ.प्रयागबाई बालासाहेब टेंगसे तसेच देवनांद्रा ग्रामपंचायत सरपंच श्री. अशफाक खान, गटशिक्षणाधिकारी श्री. मुकेश राठोड, केंद्रप्रमुख श्री.वाल्मीक सानप आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्तावित करताना शाळेचे सन्माननीय मुख्याध्यापक श्री. भीमराव अर्जुनराव महिपाल यांनी शाळेच्या मागील पाच वर्षांचा गुणवत्ता व भौतिक बाबतीतला वाढता आलेख सर्वांसमोर स्पष्ट केला. मागील पाच वर्षात या शाळेचे तब्बल 25 विद्यार्थी नवोदय पात्र व 45 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले असून शाळेतील प्रत्येक वर्ग डिजिटल आहे. तसेच शाळेची पटसंख्या दरवर्षी वाढत असून सध्या ती 625 आहे असे त्यांनी नमूद केले. यावर्षी पाथरी तालुक्यातून नऊ विद्यार्थी नवोदय पात्र झाले.या शाळेचे अर्णव विनोद जुकटे, आदित्य बाबासाहेब गायकवाड, गौरव रामेश्वर सत्वधर, श्रेयस शामसुंदर बगाटे हे 4 विद्यार्थी नवोदय पात्र ठरले असून इतर शाळांचे नाविन्य सुबोध भदर्गे, श्रेया उद्धव कुठे, ऋषिकेश ज्ञानेश्वर भिसे, सोहम ज्ञानेश्वर हारकळ, वीरांश सिद्धलिंग मोदे या सर्वांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

नवोदय पात्र 4 विद्यार्थी व 90% पेक्षा जास्त गुण असणारे 20 सर्व विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक श्री. प्रकाश पोपळघट, वैष्णव झांजे, प्रवीण गोरे, विक्रम कोळपे, मारुती रोकडे यांचा पालकांच्या व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी त्यांचे पालक, इतर शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री.अंगद भागवत सर, मोहिते सर,गिरी सर,रोंगे सर,घुले सर,देवडे सर,विशाल सर,टोपे सर,काळे सर,जाधव सर, कावळे मॅडम,बिरादार मॅडम,जाधव मॅडम,घुमरे सर,कोळपे सर,रोकडे सर आदींनी विशेष प्रयत्न केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश पोपळघट सर व रुक्मिण जाधव मॅडम यांनी केले व आभार प्रदर्शन भास्कर घुमरे सर यांनी केले.

## चिखलवर्धा शाळेचे शिक्षक पवन राठोड यांना राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत, ध्येय एज्युकेशन फाऊंडेशन (महाराष्ट्र राज्य) तर्फे दिला जाणारा मानाचा 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५' जि. प. उच्च प्राथमिक मराठी शाळा, चिखलवर्धा (ता. घाटांजी) येथील विषय शिक्षक श्री. पवन राम राठोड यांना गौरवपूर्वक प्रदान करण्यात आला.

पुण्यातील निगडी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात आयोजित 'ध्येय एज्युकेशन आयकॉन्स समिट २०२५' या भव्य सोहळ्यात हा सन्मान सोहळा पार पडला.

पवन राठोड सर यांनी शिक्षण क्षेत्रात



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. शैक्षणिक उपक्रमांमधील नवीनता, सामाजिक योगदान आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उंचावलेल्या स्तराची दखल फाऊंडेशनच्या निवड समितीने घेतली. ध्येय एज्युकेशन फाऊंडेशन ही संस्था संपूर्ण देशात विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ म्हणून काम करत असून, अशा प्रतिष्ठित व्यासपीठावर राठोड सरांचा सन्मान होणे ही घाटांजी तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. पुरस्कार स्वीकारताना पवन राठोड यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. हा सन्मान केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. सुदाम विठ्ठल शेंडगे यांनी व्यक्त केले."विद्यार्थी हिताचे हे कार्य असेच अविरतपणे सुरू राहावे आणि पवन सरांच्या मार्गदर्शनाखाली अनेक गुणवंत पिढ्या घडाव्यात, हीच आमची सदिच्छा!"या यशाबद्दल चिखलवर्धा शाळेचे शिक्षक वृंद, शिक्षण विभाग आणि पंचक्रोशीतील नागरिकांनी राठोड सरांवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

## घाटंजी तालुक्यातील गणेरीत एकदिवसीय व्हॉलिबॉल सामन्यांचे शानदार उद्घाटन !

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : क्रीडा आणि शिक्षणाची सुरेख सांगड घालत, नवयुवक क्रीडा मंडळ, गणेरी यांच्या वतीने आयोजित एकदिवसीय भव्य व्हॉलिबॉल सामन्यांचा आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचा गणेरीत मोठा गाजावाजा झाला. दोन राज्यांतील खेळाडूंच्या उपस्थितीने खेळाच्या मैदानात चैतन्य संचारले असून, गुणवंतांच्या सन्मानाने संपूर्ण गाव भारावून गेले आहे.

कार्यक्रमाचा प्रारंभ पारवा पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री. हेमंतजी चौधरी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून



विवस्वान संदीप धुर्वे, नितीन नारलावार, रुपेश कल्यमवार आणि परिसरातील इतर प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेचे खास वैशिष्ट्य म्हणजे यात महाराष्ट्रासह शेजारील तेलंगणा राज्यातील नामवंत संघांनी सहभाग नोंदवला. उद्घाटन प्रसंगी बोलताना विवस्वान धुर्वे म्हणाले की:"व्हॉलिबॉल हा केवळ शरीराचा व्यायाम नसून तो संघभावना आणि संयमाचा कस पाहणारा खेळ आहे. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळते."

**गुणवंतांच्या शिरपेचात मानाचा तुरा**

क्रीडा सामन्यांसोबतच शैक्षणिक वर्ष २०२५ मधील गुणवंतांचा गौरव करण्यात आला.

दहावी व बारावी: परीक्षेत घवघवीत यश मिळवलेले विद्यार्थी.

इतर क्षेत्र: क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात विशेष ठसा उमटवणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण आभियान संपन्न



**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी: पंडित** दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियान -2026 अंतर्गत,गेवराई पश्चिम मंडळाचे उदघाटन दिव्या गार्डन,कोळगाव येथे बीड भाजपा जिल्हाध्यक्ष मा.श्री.शंकरजी देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

याप्रसंगी भाजपा नेते श्री बाळराजे पवार, जि.प मा सभापती श्री युधाजीत पंडित, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष श्री संजय आंधळे, जिल्हा सचिव श्री शांतीनाथ डोरले, मा सभापती श्री प्रकाश काका सुरवसे, मा नगराध्यक्ष श्री सुशील जवंजाळ, नप गटनेते श्री राजेंद्र राक्षसभुवनकर, मा जिप सभापती लगड बाप्पू, श्री रोहित पंडित,

मा उपसभापती श्री अशोक शिंदे, मंडळ अध्यक्ष श्री उद्धव रासकर, श्री संदीप नागरगोजे, श्री धर्मराज आहेर, श्री बाळासाहेब सानप, बळीभाऊ कऱ्हे व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# लोकजागर मंच च्या वतीने आयोजित "माझी गुढी" स्पर्धेचा निकाल जाहीर !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ आकोट(अकोला) :** लोकजागर मंच विविध उपक्रम राबवित असते या ही वर्षी मराठी नववर्षाच्या शुभ पर्वावर आपल्या परंपरेचा सन्मान करण्यासाठी माझी गुढी स्पर्धेचे आयोजन लोकजागर महिला मंचच्या वतीने करण्यात आले होते. या स्पर्धेत तेल्हारा, अकोट तालुक्यातील महिला स्पर्धकांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन अतिशय उत्तम असे गुढी चे सादरीकरण केले होते यामध्ये पर्यावरण पुरक साहित्याचा वापर करून गुढी उभारल्या यामध्ये निसर्ग संवर्धन विषयक जनजागृती, बेटी बचाव बेटी पढाव, तर काहींनी भारतीय संस्कृती चे दर्शन आपल्या गुढी सजावटीतून घडवून आणले



सोबतच गुढी पाडवा सणाचे पारंपरिक महत्व जपत महिलांनी आपल्या घरासमोर आकर्षक गुढी उभारली होती.

माझी गुढी या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला यामध्ये प्रथम क्रमांक सुरेखा नरेंद्र चितोडे तेल्हारा, द्वितीय क्रमांक प्रगती प्रवीण पवार सोमवार वेस अकोट, तृतीय क्रमांक भारती महादेव राऊत, संभाजी नगर हिवरखेड यांनी पटकावला. उत्तेजनार्थ क्रमांक मध्ये माया गोपाल खोपाले, योगिता राम पाऊलझगडे, हर्षाली योगेश तायडे, शितल नितीन वरणकर, लता सुरेंद्र चिकटे, तर विशेष पुरस्कार हा खापरखेड येथील जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी व विद्यार्थिनी त्याचबरोबर मुख्याध्यापिका नयना सरोदे यांना देण्यात येत आहे. तसेच या माझी गुढी स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात येईल असे लोक जागर मंचाचे संस्थापक अध्यक्ष अनिल गावंडे यांनी कळवले आहे.

प्रथम क्रमांकासाठी ३००० रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २००० रुपये व तृतीय क्रमांकासाठी १००० रुपये तसेच स्मृतिचिन्ह व पैठणी देण्यात येणार आहे. याशिवाय पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ पेठणी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**लोकजागर महिला मंचच्या वतीने आयोजित माझी गुढी स्पर्धेत अकोट, व तेल्हारा तालुक्यातील महिला स्पर्धकांनी सहभाग नोंदवला अतिशय आकर्षक आणि पर्यावरण पुरक साहित्याचा वापर करून गुढी उभारल्या होत्या. आता या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला.**

**अनिल गावंडे**
**संस्थापक अध्यक्ष**
**लोकजागर मंच**

# ६ दिवसीय सांधेदुखी (जॉइंट रिप्लेसमेंट) तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**रिसोड (प्रतिनिधी) रणजीत ठाकूर :** ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन मुंबई मुख्यमंत्री सहाय्यता निधी तर्फे २४ ते २९ मार्च २०२६ या कालावधीत बुलढाणा, हिंगोली व रिसोडे आयोजित करण्यात आलेल्या ६ दिवसीय सांधेदुखी (जॉइंट रिप्लेसमेंट) तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या शिबिरात एकूण ८४० रुग्णांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी २८६ रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदान करण्यात आले. शिबिराच्या पहिल्या दिवशी बुलढाणा येथे १४३ रुग्णांची तपासणी करण्यात आली, त्यापैकी ३७ रुग्णांना शस्त्रक्रियेची गरज असल्याचे आढळले. दुसऱ्या दिवशी हिंगोली येथे १०१ रुग्ण तपासण्यात आले असून २६ रुग्णांना शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला.

२६ ते २९ मार्च दरम्यान रिसोड येथे अनुक्रमे १२८, १२०, १६० आणि १८८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ५४, ५३, ५२ आणि ६४ रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले.या शिबिरामुळे गंभीर सांधेदुखी व सांध्यांच्या विकारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांची वेळेत ओळख होऊन त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन मिळाले आहे. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांपर्यंत अत्याधुनिक अस्थिरोग सेवा पोहोचविण्याच्या फाउंडेशनचा हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे.

या शिबिरामुळे रुग्णांच्या वेदना कमी करून त्यांची हालचाल सुधारण्यास तसेच जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होणार असल्याचा विश्वास ममता मधुसूदन अग्रवाल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री मधुसूदनजी अग्रवाल यांनी व्यक्त केला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी स्थानिक कोर कमिटीचे उत्तमचंदजी बगडिया, संजय उकळकर, संतोष वाघमारे,डॉ शारीरिक अन्सारी, दीपेन शर्मा, डॉ अजय पाटील, विनोद मोरे, आवेज खान, विठ्ठल वसू, संत अमरदास अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे सर्व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# मानवतेसाठी दाभोलकरांच्या विचारांना कवितेत घ्या !! साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** मोहोपाडा रसायनी येथे अंनिसच्या जिल्हा मंडळाने घेतलेल्या काव्य स्पर्धेच्या अध्यक्षीय भाषणात साहित्य रत्न रायगडभूषण प्रा.एल.बी. पाटील म्हणाले की सामाजिक वातावरण दुष्ट प्रवृत्तीने भरले आहे यावेळी मानवतेसाठी दाभोलकरांच्या विचारांना घेऊन कवितेतून प्रबोधन करावे. कार्यक्रमाचे उद्घाटन मोहोपाड्याच्या सरपंच उमा मुंढे यांनी करून " कविता समाज विकास साधणा-या बोली भाषेत देऊन वेगळा आनंद द्यावा, असे विचार मांडले.यावेळी कोकणगोवा रस्त्याचे अभ्यासक चैतन्य उषा लक्ष्मण, ज्येष्ठ कवी डॉ.राजेंद्र राठोड, तंबाखू विरोधक मच्छिंद्र म्हात्रे,नशा विरोधी प्रचारक लवेंद्र मोकल इ.प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती नाईक यांनी सुरेख केले.कवी विजय





कुमावत, धनंजय पाटील,अजय शिवकर कामिनी खाडीलकर, कृष्णा गावडे,अनिल सोनवणे,नरेश पाटील,बी.एन.घरत, प्रदीप गर्जे विमल जावळे, राजेंद्र जाधव, चेतना सावंत इत्यादी ४३ कवींनी कविता सादर केल्या.

# तहसील कार्यालय महागाव येथे आशा दिवस साजरा

**दैनिक युवक आधार**

**एम डी सूरोशे/महागाव (यवतमाळ) :** आज दिनांक २८/३/२०२६ रोजी तहसील कार्यालय महागाव येथे आशा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आमदार किसनरावजी वानखेडे होते. उद्घाटक म्हणून मा. नितीनभाऊ भूतडा तर प्रमुख पाहुणे म्हणून महागाव नगरपंचायत नगराध्यक्षा श्रीमती रंजना आडे ताई , उपनगराध्यक्ष मा. प्रमोद भरवाडे ,जगदीश भाऊ नरवाडे , डॉ सल्लावर सर ,डॉ इरफान कुंदन होते .सदर कार्यक्रमाचे आयोजन मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निमिष धुळधूळे यांनी केले . या कार्यक्रमात उत्कृष्ठ काम करणाऱ्या आशा सेविका यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित



करण्यात आले आणि आशानी यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील श्री हरीश राठोड , श्री गोपाल ठाकरे , डॉ.नीलकंठ जाधव ,श्री जोतिबा जळकोटे , श्री प्रभाकर मोरे , श्री वसंत जाधव , उके , रियाज , पुरी मामा , जाधव ताई यांनी सहकार्य केले . यावेळी आशा गटप्रवर्तक तसेच मोठया संख्येने आशा स्वंयसेविका हजर होत्या

आशा सेविका यांनी आपल्या प्रस्ताविक संबोधन करताना सहा महिन्यापासून मानधन नाही हाच मुद्दा घेऊन लगेच श्री नितीन भाऊ भुतडा व आमदार किसनराव वानखेडे यांनी जिल्ह्यापासून मुंबईपर्यंत तात्काळ अधिकाऱ्यांसोबत संभाषण करून मुंबई येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना परिस्थिती समजावून सांगितल्यावर लगेच सोमवारला मानधन खात्यामध्ये जमा करण्यात येईल असे अश्वस्त करण्यात आले त्यामुळे सर्व आशा सेविकांना आनंद द्विगुणीत झाला.

# नवरदेव बोहल्यावर चढण्यापूर्वी थांबविण्यात आला

## दामिनी पथक गोंदिया व जिल्हा महिला बालविकास, इंडियन वेलफेअर सोसायटी गोंदिया यांची संयुक्त कारवाई

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** दिनांक 28/3/2026 रोजी तिरोडा येथे बालविवाह होत असल्याची गोपनीय माहिती प्राप्त होताच. मा. जिल्हाधिकारी प्रजित नायर, मा.जिल्हा पोलीस अधीक्षक गोरख भामरे, मा. जिल्हा कार्यक्रम अधिकारी कीर्ती कुमार कटरे आणि मा.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौनिकर यांचे आदेशान्वये आणि मार्गदर्शनात दामिनी पथकचे गोंदिया चे पोलीस निरीक्षक योगिता चाफले मॅडम, जिल्हा बाल संरक्षण कक्ष , चाइल्ड हेल्पलाइन, इंडियन सोशल वेल्फेअर सोसायटी गोंदिया, दामिनी पथक यांची टीम तयार करून प्राप्त माहितीनुसार होऊ घातलेल्या विवाहातील बालक आणि बालिकेचे जन्म प्रमाणपत्र नगरपरिषद तिरोडा कडून प्राप्त करून घेण्यात आले. सदर प्रमाणपत्रानुसार बालिकेचे वय बालविवाह प्रतिबंध कायद्यानुसार पूर्ण नसल्याचे दिसून आले. त्या अनुषंगाने संपूर्ण टीम तिरोडा येथे 12 वाजता पोहोचले.दामिनी पथक चे पोलीस निरीक्षक योगिता चाफले, सहायक



पोलीस निरीक्षक मनिषा निकम मॅडम, पोलीस उपनिरीक्षक पूजा सुरळकर, पो. शि. प्रशांत बनसोड, म. पो. शि. सोनाली टिके, म. पो. शि. प्रीती बुरेले, म. पो. शि, वैशाली भांडक्कर, पर्यवेक्षिका पद्मशाली मॅडम,अंगणवाडी सेविका, नगरसेवक अनिकेत कटरे, वार्ड बाल संरक्षण समितीचे इतर सदस्य यांची बैठक घेऊन सदर होणाऱ्या विवाहाबद्दल माहिती देण्यात आली.

मंडप पूजन व हळदीचा कार्यक्रम 4 एप्रिल 2026 रोजी आणि 5 तारखेला सकाळी 11.30 वाजता लग्न होत असल्याची माहिती मिळाली होती. दामिनी पथक सह, महिला बाल विकास विभाग व इंडियन सोशल वेल्फेअर सोसायटी च्या टीमने नवरदेव, नवरी त्यांच्या आई वडील आणि नातेवाईक यांचेकडे चौकशी करुन सदर होऊ घातलेल्या विवाहातील बालकांचे वय कमी असून बालविवाह प्रतिबंधक 2006 च्या कायद्यानुसार वय पूर्ण नसल्याने गुन्ह्यास पात्र आहे. बालविवाहमुळे होणारे दुष्परिणाम बालकांना आणि त्यांच्या नातेवाईकांना समजावून सांगण्यात आले. वय पूर्ण झाल्याशिवाय लग्न करणार नाही असे कायदेशीर हमीपत्र बालकांच्या आई-वडिलांकडून आणि नातेवाईकांकडून आणि बाल संरक्षण समितीच्या सदस्यांकडून लिहून घेण्यात आले. बालविवाह मुक्त भारत, बालविवाह मुक्त महाराष्ट्र आणि गोंदिया जिल्हा या महत्त्वकांक्षी अभियानाची मोहीम सुरू असून बालविवाह मुक्त गोंदिया करण्यासाठी आपला संकल्प अभियान सुरू आहे. याप्रसंगी जमलेल्या सर्व लोकांना अशा प्रकारचे बालविवाह होत असल्यास अंगणवाडी सेविका, जवळचे पोलीस स्टेशन, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड हेल्पलाइन च्या टोल फ्री क्रमांक 1098 वर संपर्क साधावे असे सांगण्यात आले.

जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे यांचे नेतृत्वात ही कार्यवाही करण्यात आली. जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या सामाजिक कार्यकर्ता मनीषा चौधरी आणि इंडियन सोशल वेल्फेअर सोसायटीच्या दीपमाला भालेराव यांनी बालिकेचे समुपदेशन करून पुढील शिक्षण घेणार असल्याचे बालिकेने सांगितले. बालिकेला मा. बालकल्याण समिती गोंदिया यांच्या समक्ष सादर करून पालकांच्या ताब्यात देण्यात आले. सदर होणारा बालविवाह थांबविण्याकरिता दामिनी पथकाचा पोलीस निरीक्षक योगिता चाफले व . सहायक पोलीस निरीक्षक मनिषा निकम मॅडम, पोलीस उपनिरीक्षक पूजा सुरळकर, पो.शि. प्रशांत बनसोड, म. पो. शि. सोनाली टिके, म. पो. शि. प्रीती बुरेले, म. पो. शि, वैशाली भांडक्कर, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे मुकेश पटले संरक्षण अधिकारी, इंडियन सोशल वेल्फेअर सोसायटीचे जिल्हा समन्वयक ज्ञानेश्वर पटले, बाल विकास प्रकल्प अधिकारी तिरोडा विनोद चौधरी, आणि रवींद्र टेंभुर्णे संरक्षण अधिकारी,चाईल्ड लाईनचे अजय खोब्रागडे आणि तिरोडा पोलीस स्टेशन बालविवाह थांबविण्याच्या कार्यवाहीमध्ये सहभागी होते.

# माहिती देण्यास पुरवठा अधिकाऱ्यांची टाळाटाळ, तहसीलदारांनी सांगितल्यानंतर माहिती देईन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेलच्या पुरवठा विभागात सावळा गोंधळ गेल्या काही महिन्यांपासून सुरूच आहे. अनेक नागरिकांचे काम न होताच त्यांना परत जावे लागत आहे. त्यातच पुरवठा अधिकारी जेष्ठ नागरिक, पत्रकार किंवा कोणीही व्यक्ती आले तरी त्यांना बसायला सांगत नसल्याने नागरिकांचा रोष वाढत आहे. पनवेल पुरवठा विभागातून अनेक रेशन दुकानदारांना जास्तीची दुकाने जोडली गेली आहेत. त्याचा त्रास दुकानदारांना देखील होत आहे अधिकचा माल आल्यास तो ठेवायचा कोठे असा प्रश्न त्यांच्यासमोर उपस्थित होतो. मात्र अद्याप देखील जाहीरनामे काढण्यात आलेले नसल्याचे समोर आले आहे. यातील काही रेशन दुकानदारांना इतर जोडलेली दुकाने नको आहेत तरी देखील त्यांना दुकाने जोडण्यात आलेली आहेत. याबाबतची माहिती घेण्यास काही नागरिक गेले असता पुरवठा अधिकारी यांनी जाहीरनाम्याची माहिती देण्यास टाळाटाळ केली आणि तहसीलदारांनी सांगितले तरच माहिती देईन असे सांगितले. त्यानंतर तहसीलदारांसोबत संपर्क साधला असता तहसीलदारांनी ती माहिती पुरवठा अधिकारी याना देण्यास सांगितले. याशिवाय अनेकांना तालुक्यात वेळेवर धान्य मिळत नाही तसेच कमी धान्य दिले जाते. या तक्रारीनंतर देखील रेशनिंग दुकानदारांवर कसल्याही प्रकारची कारवाई पुरवठा अधिकाऱ्यांकडून केली जात नाही. पुरवठा विभागात खाजगी माणसं देखील काम करत आहेत त्यांचा पगार शासना व्यतिरिक्त कोण करतो याची देखील चौकशी होणे गरजेचे आहे.

तसेच ही खाजगी माणसे तक्रार देण्यास आलेल्या नागरिकांसोबत उद्धटपणे वागतात. मात्र पनवेल पुरवठा अधिकारी त्यांना पाठीशी घालत असल्याचे समोर आले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदात्त स्वायत्त) येथे पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदात्त स्वायत्त) येथे पदवी, पदव्युत्तर आणि पी.एच.डी वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचे आयोजन सोमवार दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते सन्माननीय श्री. रामशेठ ठाकूर व प्रमुख पाहुणे म्हणून लखनऊ विद्यापीठ आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील माजी कुलगुरू, सन्माननीय प्रो.(डॉ.) एस. बी. निमसे यांनी भूषविले.

या प्रसंगी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अरुणशेठ भगत , व्हाईस चेअरमन मा. श्री. वाय. टी. देशमुख , संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य मा. श्री. अनिल भगत व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सदस्य अॅड. राहुल घरत तसेच संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती या सोहळयाला लाभली. या प्रसंगी प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. पाटील आणि कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखांचे प्रमुख तसेच विविध विभागांचे प्रमुख मंचावर मान्यवरांसोबत उपस्थित होते.




या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळयामध्ये पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि पदवी प्रमाणपत्र तसेच पी.एच.डी प्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ,पदवी प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. या शानदार समारंभामध्ये एन.सी.सी.च्या पथकाने उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. या सोहळयाची सुरवात सुरेल राज्य गीताने झाली. त्यानंतर प्राचार्य मा. प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये महाविद्यालयातील गौरवशाली परंपरांचा आढावा घेतला. तसेच प्रमुख पाहुण्यांची ओळख विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण कक्षाचे समन्वयक डॉ. एस. एन. परकाळे यांनी करून दिली.

या सोहळयाचे प्रमुख पाहुणे सन्माननीय प्रो.(डॉ.) एस. बी. निमसे यांनी आपल्या भाषणात भारताला विश्वगुरू बनण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आणि कौशल्याधारित ज्ञानाची आवश्यकता आहे. भविष्याचा विचार करता कसदार आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देण्यासाठी आणि परदेशातून भारताकडे शिक्षणासाठी अधिकाधिक विद्यार्थी आकर्षित होण्यासाठी आपण प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर बौद्धिक कुतूहल, महत्त्वाकांक्षा आणि आपण निवडलेल्या क्षेत्राबद्दल सार्थ अभिमान हे तीन गुण आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंगी असणे अत्यंत आवश्यक आहे. आयुष्यात यशस्वी झाल्यानंतर देखील आपल्या महाविद्यालयाप्रती सर्व विद्यार्थ्यांनी कृतज्ञ राहणे आवश्यक आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपैकी सर्वाधिक प्रमाण विद्यार्थिनींचे असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.

मा. श्री. रामशेठ ठाकूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना उद्देशुन सांगितले की, इच्छाशक्ती असेल तर संघर्ष करण्याची ताकद आपल्या पायात आपोआप येते. आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जागतिक दर्जाचे यश मिळवावे, अशी अपेक्षा त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केली. त्याचबरोबर या महाविद्यालयात मधून पदवी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे त्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या सोहळयामध्ये सर्व पालक व गुणवंत विद्यार्थ्यांचे चांगू काना ठाकूर कॉलेजचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांनी कौतुक केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परीक्षा नियंत्रक प्रो. (डॉ.) एस. आय. उन्हाळे, विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण कक्षाचे समन्वयक प्रा. (डॉ.) एस. एन. परकाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. (डॉ.) बी. डी. आघाव यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळयाचे आभार प्रदर्शन परीक्षा नियंत्रक प्रो. (डॉ.) एस. आय. उन्हाळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. (डॉ.) गीतिका तंवर, प्रा. ए. व्ही. पाटील आणि प्रा. एन. एच. कडू यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# भारतीय जनता पार्टीच्या कडा मंडळ उपाध्यक्षपदी सुखदेव खाकाळ यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी / बाळासाहेब रकटाटे :** दौलावडगाव गट आणि आष्टी तालुक्याच्या मातीतून घडलेले निष्ठावान, प्रामाणिक व जनतेसाठी आयुष्य झिजवणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेले सुरेश आण्णा धस यांचे कट्टर समर्थक मा. माजी जिल्हा परिषद सदस्य श्री. सुखदेवरावजी खाकाळ (मेंबर) यांची भारतीय जनता पार्टीच्या कडा मंडळ उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे तालुक्यात आनंदाचे



वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कडा येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियानाच्या द्वितीय सत्रादरम्यान हा नियुक्ती सोहळा पार पडला. या कार्यक्रमास आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे विधानसभेचे सदस्य सुरेश आण्णा धस राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. स्वरूपसिंह हजारी, भाजप नेते देविदास नागरगोजे तसेच चंद्रकांत फड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला.


सुखदेव खाकाळ यांनी आपल्या सामाजिक व राजकीय कार्यातून नेहमीच सामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले आहे. त्यांनी पदाची अपेक्षा न ठेवता निस्वार्थपणे काम करत जनतेच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या कार्यपद्धतीतून निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समाजाभिमुख दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो.

त्यांच्या या निवडीमुळे कडा मंडळात संघटनबांधणीस बळ मिळणार असून विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, विविध मान्यवर, कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. अनिल तात्या ढोबळे तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी कडा मंडळ यांनी नियुक्तीचे पत्र देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# पाळीव कुत्र्याची शिकार करुन बिबट्याचा शेतात ठिय्या!

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागांव : यवतमाळ** येथील दत्तोबाटेकडीच्या बाजूला असलेल्याशेतशिवारात एका बिबट्यानेपाळीव कुत्र्याची शिकार करूनथेट ज्वारीच्या पिकातचमुक्काम ठोकल्याचा प्रकारउघडकीस आला आहे. महागाव परिसरातीलशेतकरी दीपक साहेबरावनरवाडे शेतात फेरफटका मारतअसताना, ज्वारीच्या पिकाच्या बाजूला त्यांचा पाळीव कुत्रामृतावस्थेत पडलेला त्यांनादिसला. कुत्र्याची अत्यंतनिर्घृणपणे शिकार करण्यातआली



होती. यामुळे शेतातबिबट्या असल्याचा संशय आणखी वाढला. त्यांनीतातडीने शेजारील शेतातअसलेल्या आपल्या भावालाआणि इतर शेतकऱ्यांना याचीमाहिती दिली. ज्वारीच्यापिकात दिसला बिबट्यापरिस्थितीचे गांभीर्य ओळखून दीपक यांचे भाऊ आणि काही शेतकरी झाडावर चढले,काही जण सुरक्षित अंतर ठेवूनज्वारीच्या पिकाच्या बाजूने शोधघेऊ लागले. याच दरम्यान,पाळीव कुत्र्याची शिकार करूनबिबट्या बिनधास्तपणेज्वारीच्या दाट पिकात दबाधरून बसल्याचे त्यांच्यानिदर्शनास आले. बिबट्यासमोर दिसताच शेतकऱ्यांचीएकच धावपळ उडाली. वनविभागाची रेस्क्यू टीमघटनास्थळी दाखल झालीशेतकऱ्यांनी प्रसंगावधान राखततात्काळ या घटनेची माहिती वनविभागाला दिली.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने जितेंद्र मुंडकर सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने पनवेल तालुक्यातील चिंचपाडा येथील जितेंद्र मुंडकर यांना सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग यांच्यातर्फे 25 आणि 26 मार्च रोजी मुंबई येथे पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सध्याची तरुण पिढी व्यसनांच्या आहारी गेली आहे. मात्र अनेक ठिकाणी दारूबंदी कागदावरच राहत आहे. चिंचपाडा येथील जितेंद्र मुंडकर यांनी व्यसन या चित्रपटाद्वारे गावागावात जाऊन स्वतःची गाडी घेऊन व्यसन या चित्रपटाच्या माध्यमातून नागरिकांचे, तरुणांचे प्रबोधन केले तसेच व्यसनापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. गेली अनेक वर्ष मुंडकर यांनी हे



काम केले. व्यसनामुळे अनेकांचे आयुष्य उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे आता जरी व्यसन सोडा असा मोलाचा सल्ला त्यांनी तरुणांना दिला. या कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.


# सिल्लोड-निल्लोड फाट्यावरील पुलांचे डांबरीकरण पूर्ण

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-**छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावरील निल्लोड फाटा ते सिल्लोड दरम्यान नाल्यांवरील पुलावर असलेल्या खड्ड्यांवर कंत्राटदाराने डांबरीकरण केल्याने वाहन चालकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

याबाबत माहिती अशी की, गेल्या सात-आठ वर्षांपासून छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावरील सिमेंट रस्ते व पुलाचे काम सुरू आहे. निल्लोड फाटा ते सिल्लोड दरम्यान या सहा किलोमीटर अंतरातील सिमेंट रस्त्याचे व नाल्यांवरील पुलाचे काम पूर्ण होऊन जवळपास चार ते पाच वर्षे पूर्ण झाली होती. मात्र, या सिमेंट रस्त्यावरील दोन्ही बाजूने नाल्यांवरील



पुलावर खड्डे निर्माण झाले होते. या पडलेल्या खड्ड्यांमुळे जोरदार वेगाने धावणाऱ्या अनेक वाहनांचे टायर फुटले होते. या मार्गावर धावणाऱ्या वेगवान वाहनांच्या चालकांच्या पुलावरील खड्डे लक्षात येत नसल्याने वाहने या खड्ड्यांत आदळत असत. काही वाहनचालक खड्ड्याजवळ येताच वाहनाचा वेग कमी करीत, अशा वेळी पाठीमागील वाहने आदळल्याच्या अनेक घटना घडल्या होत्या. यामुळे वाहन चालकांत अनेकदा वादही निर्माण झाले होते.

तसेच काही ठिकाणी पुलांवरील खड्ड्यांमुळे लोखंडी बार (सळई) उघडे पडले होते. संबंधित कंत्राटदाराने बुधवारी दिवसभर महामार्गावरील पुलावर असलेल्या खड्ड्यांवर मशीनद्वारे डांबरीकरण केले असल्याने वाहन चालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून काही वाहन चालकांनी मनोमन समाधान व्यक्त केले.

**अपूर्ण कामे पूर्ण करण्याची मागणी**

सिल्लोड तालुक्यातील माणिकनगर (भवन) येथील छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावरील दुभाजकाचे काम, नालीचे काम व सिमेंट रस्ता तसेच पूर्णा नदीवरील पुलाचे असे मिळून एकूण १० टक्के काम अपूर्ण आहे. हे काम सध्या धिम्या गतीने सुरू असून, राहिलेले नालीचे काम, नालीवर ढापे टाकणे आणि सिमेंट रस्त्यासह पूर्णा नदीवरील पुलाचे १० टक्के काम त्वरित पूर्ण करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# कालवंश अन्नपूर्णाबाई केरबाजी निखाते यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- प्रकाश गवारे :** भीमनगर मेंडका येथील रहिवासी कालवंश अन्नपूर्णाबाई केरबाजी निखाते यांचे आज दि. 30 मार्च 2026 रोजी पहाटे ४:०० वाजता, वयाच्या 95 व्या वर्षी दुःखद निधन झाले.त्या अत्यंत साध्या, प्रेमळ व कुटुंबवत्सल स्वभावाच्या होत्या. त्यांच्या निधनामुळे कुटुंबीय तसेच परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात कुटुंबासाठी दिलेले योगदान आणि त्यांचा स्नेहभाव सर्वांच्या स्मरणात कायम



राहणार आहे.त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी आज दि. 30 मार्च 2026 रोजी सायंकाळी 7 वाजता भीमनगर मेंडका येथील स्मशानभूमीत होणार आहे.

# अकोला- वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर सहकार पॅनल चे वर्चस्व !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी**

**अकोट (अकोला):** अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अकोला च्या दिनांक २९ मार्च रोजी पार पडलेल्या निवडणुकीचा निकाल दि. ३० मार्च सोमवार ला जाहीर झाला. या निवडणुकीत सहकार पॅनल ने घवघवीत यश संपादन करून सहकार क्षेत्रातील आपले वर्चस्व कायम ठेवले आहे.

अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत डॉ. संतोषकुमार कोरपे यांच्या नेतृत्वाखालील 'सहकार पॅनल 'ने ऐतिहासिक विजय मिळवत आपले वर्चस्व कायम राखले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बँकेवर सहकार परिवार ची सत्ता आहे.

आकोट तालुक्यातून जिल्हा बँकेवर तीन संचालक निवडून दिले जातात. त्यात सहकारी संस्था मतदारसंघात ज्येष्ठ सहकार नेते नानासाहेब हिंगणकर यांच्या पत्नी सौ. उषाताई



हिंगणकर यांनी ५८ पैकी ४२ मते घेऊन प्रचंड मताधिक्याने विजय प्राप्त केला आहे. त्याचे प्रतिस्पर्धी उमेदवाराला १४ मतांवर समाधान मानावे लागले. २ मते अवैध ठरली. इतर मागास वर्ग मतदार संघातून शेतकरी नेते ललित बहाळे हे ९२६ मते घेऊन विजयी झाले आहेत. तर त्यांचे प्रतिस्पर्धी असलेल्या उमेदवाराला १३० मतावर समाधान मानावे लागले. ज्येष्ठ सहकार नेते स्व. हिदायतउल्ला खां पटेल यांचे चिरंजीव जावेद पटेल प्रक्रिया सहकारी संस्था मतदारसंघात यापूर्वीच अविरोध निवडून आले आहेत.अकोट तालुक्यातील तीन पैकी तीन संचालक जिल्हा बँकेचे संचालक पदी निवडून आल्याने सहकार परिवाराने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. या विजयाचे श्रेय विद्यमान अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे व ज्येष्ठ नेते नानासाहेब हिंगणकर यांचे कुशल नेतृत्वाला दिल्या जात आहे.

सहकार परिवाराचे वर्चस्व कायम : जिल्हा बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीततालुक्यातून तीन संचालक प्रचंड मताधिक्याने विजयी झालेत. या विजयामुळे अकोट तालुक्यातील सहकार परिवाराचे वर्चस्व कायम असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. या निवडीबद्दल सहकार परिवाराचे कार्यकर्त्यांनी जल्लोष करून आनंद व्यक्त केला आहे.या नेत्रदीपक विजयाचे श्रेय सर्व मतदार तथा सहकार परिवारातील पुढारी, विविध संस्थांचे पदाधिकारी संचालक व निष्ठावान कार्यकर्त्यांना देत नानासाहेब हिंगणकर यानी सर्वाचे आभार मानले.

# महावीर जन्म कल्याणका निमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया/भंडारा जिल्हा प्रतिनिधी :** जैन धर्मातील २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जन्म कल्याणकानिमित्त शहरात भक्तिमय वातावरणात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महिला मंडळाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला संपूर्ण जैन समाजाला विनम्र आमंत्रण देण्यात आले आहे.

हा पवित्र कार्यक्रम ३१ मार्च रोजी सकाळी १० वाजता राजस्थानी भवन येथे आयोजित करण्यात आला असून, मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. आयोजकांनी सर्व नागरिकांना आपल्या कुटुंबासह उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

कार्यक्रमात धार्मिक विधी, प्रवचन आणि भक्तिमय वातावरणात विविध उपक्रम पार पडणार आहेत. विशेषतः उपस्थितांना शिस्त व एकात्मतेचा संदेश देण्यासाठी श्रावकांनी पांढरे वस्त्र आणि श्राविकांनी केशरी वस्त्र परिधान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कार्यक्रमानंतर स्वामी वात्सल्य (सामूहिक भोजन) आयोजित करण्यात आले असून, सर्वांनी प्रसादाचा लाभ घ्यावा असेही आयोजकांनी नमूद केले आहे.महावीर जयंतीच्या निमित्ताने अहिंसा, सत्य आणि करुणेचा संदेश समाजात रुजवण्याचा हा एक सुंदर प्रयत्न असल्याचे महिला मंडळाने सांगितले.

# शालेय विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मुलाखती दरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर भावनिक

## 'एक मुलाखत - यशस्वी माजी विद्यार्थ्याची' मालिकेत लोकनेते रामशेठ ठाकूर यांची मुलाखत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागातील उपक्रमशील विद्यालय अशी ओळख असणाऱ्या गव्हाण कोपर येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये ' एक मुलाखत - यशस्वी माजी विद्यार्थ्याची ' या नाविन्यपूर्ण नवोक्रमात विद्यालयाचे प्रेरणास्थान रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांची अत्यंत माहितीपूर्ण व खुमासदार दीर्घ मुलाखत घेतली.

या मुलाखती दरम्यान सुरुवातीलाच लोकनेते रामशेठ ठाकूर हे अत्यंत हळवे आणि भावूक झाल्याचे दिसले. मुलाखतीच्या प्रारंभी ' या विद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून ह्या क्षणाला आपल्या नेमक्या भावना काय आहेत ?' ह्या बाल मुलाखतकाराच्या प्रश्नाला उत्तर देताना लोकनेते रामशेठ ठाकूर हळवे व भावूक होत म्हणाले," माझे अनेक ठिकाणी हजारो लाखो सत्कार झाले परंतु मी ज्या शाळेत शिकलो,घडलो त्या विद्यालयात माझ्या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने ही मुलाखत संपन्न होतेय,माझा सत्कार होतोय याच्यासारखा आनंद नाही,याची बरोबरी दुसऱ्या कुठलाही सत्काराला किंवा मुलाखतीला येणार नाही असे भावनिक उद्गार काढून प्रचंड हळवे झाले. ह्या नाविन्यपूर्ण उपक्रम मालिकेच्या तिसऱ्या भागाचे चित्रीकरण विद्यालयाच्या प्रांगणात रामनवमीच्या दिनी दि.२६ मार्च २०२६ रोजी पूर्ण करण्यात आले. द्यालयाचे माजी विद्यार्थी व आधारस्तंभ रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य सदस्य,सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक, क्रीडा,कला,राजकीय व उद्योग क्षेत्रातील दानशूर बहुआयामी व्यक्तिमत्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मुलाखतीने या विशेष उपक्रमाच्या मालिकेचे तिसरे पुष्प गुंफले.लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ' रामपर्व '




ह्या सांस्कृतिक सोहळयाच्या पार्श्वभूमीवर ही मुलाखत संपन्न झाली.

यावेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे.एम. म्हात्रे, जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, जुनिअर कॉलेज विभागाचे स्थानिक शाळा समितीचे सदस्य व जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख, वहाळ साई संस्थानचे अध्यक्ष रविशेठ पाटील, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर,विश्वनाथ कोळी,ॲड. राहुल घरत व विजय घरत, भार्गव ठाकूर, वसंतशेठ पाटील, एम.डी.खारकर, बी.टी. कांबळे गुरूजी, रत्नप्रभा घरत, रघुनाथ देशमुख, राम मोकल, योगिता भगत, मिनाक्षी पाटील, सुहास भगत, हेमंत ठाकूर, किशोर पाटील, निलेश खारकर, धीरज ओवळेकर, साईचरण म्हात्रे,

सुधीर ठाकूर, जयवंत देशमुख, वैभव घरत, उत्तम कोळी, कामिनी कोळी, विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर,उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,संस्थेचे जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर,लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे,मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवळकर,पर्यवेक्षिका प्रणिता गोळे आदी मान्यवर,पंचक्रोशीतील ग्रामस्थ,शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

शिक्षक सागर रंधवे यांचे संहिता लेखन व दिग्दर्शन तसेच मल्हार टीव्हीचे विशेष तंत्रसहाय्य,उपशिक्षक विशांत ठाकूर यांचे विशेष सहाय्य व कलाशिक्षक गणेश भोईर यांनी साकारलेली समर्पक व आकर्षक वटवृक्षाच्या पारावरील माजी विद्यार्थ्यांची प्रतिकृती यामुळे हे चित्रिकरण प्रभावी झाले.

**विद्यार्थी मुलाखतकारांचे कुतुहलयुक्त प्रश्न !**

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना सामाजिक,राजकीय,शैक्षणिक व उद्योगक्षेत्रातील प्रेरणा कोणाकडून मिळाली ,कामाच्या व्यग्रतेतून कुटुंबासाठी कसा वेळ देता,प्रशासकीय अनुभव,समाजोपयोगी कामे,तरूणांना संदेश,बालपणीच्या आठवणी, शालेय जीवनातील अनुभवावर आधारीत वैविध्यपूर्ण व कुतूहलपूर्ण प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारले. मुलाखतकाराच्या भूमिकेत वावरताना विलक्षण उत्साह,नाविन्यपूर्ण उपक्रमाची अनुभूती व आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडत होता.अत्यंत आत्मविश्वासाने विद्यार्थ्यांनी ह्या भागाचे चित्रीकरण यशस्वीपणे पूर्ण केले.

लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर खरंतर हे हिमालया इतके उत्तुंग व्यक्तिमत्व परंतु मुलाखतकाराच्या भूमिकेत वावरणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांना अत्यंत समर्पक,हसत खेळत,मनमोकळेपणाने आणि मिश्किलपणे तर आंदोलनाची आक्रमकता दाखवतानाचा कणखर बाणा, संसदेमधील अनुभव कथन करताना मंत्रीपदाच्या प्रलोभनांना बळी न पडता दर्शविलेला प्रामाणिकपणा तर कधी हळवेपणाने भावूक होत आपल्या स्वभावातील मृदूता व तरल स्वभावाचे प्रदर्शन करीत सहजपणे उत्तरे दिली. मुलाखतकार विद्यार्थ्यांमध्ये आरोही नाळे, स्मित मोकल,कपिल सोनकांबळे,अभिलाषा म्हात्रे,आदिती पाटील,सात्विक भोईर,सिद्धांती सुतार,व प्रज्वल कोरेकर यांचा समावेश होता.त्यांनी अत्यंत आत्मविश्वासपूर्ण मुलाखत घेतली.

# शैक्षणिक प्रश्नांवर आमदार अमित साटम यांच्यासमवेत विचारविनिमय सभा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य तसेच मुंबई महानगर क्षेत्रातील नऊ प्रमुख शैक्षणिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने विविध शैक्षणिक समस्या व धोरणात्मक मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यासाठी मा. आमदार अमित साटम यांच्या उपस्थितीत दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता अंधेरी (पश्चिम) येथील चिल्ड्रन्स वेल्फेअर सेंटर स्कूल येथे विचारविनिमय सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सभेमध्ये महामुंबई शिक्षण संस्था संघटना, अनएडेड स्कूल्स फोरम, प्रायव्हेट अनएडेड स्कूल्स मॅनेजमेंट असोसिएशन, शिक्षक संघटना आदी विविध संघटनांचा सहभाग असून या संघटनांच्या माध्यमातून राज्यातील सुमारे साडेचार हजारांहून अधिक शैक्षणिक संस्था तसेच ३५ हजारांहून अधिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व केले जाणार आहे. सभेदरम्यान शाळांच्या मान्यता प्रक्रियेतील अडचणी, वेतनेतर अनुदानाचा प्रश्न, शिक्षकांना निवडणूक व इतर अशैक्षणिक कामांपासून सूट, पायाभूत सुविधा व NBC प्रमाणपत्राबाबत सवलती, शाळांवरील करांचा प्रश्न, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीसंदर्भातील अडथळे या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर मांडणी केली जाणार आहे.

याशिवाय अल्पसंख्यांक, स्वयंअर्थसहाय्यित व विनाअनुदानित इंग्रजी माध्यम शाळांच्या समस्या व त्यावरील उपाययोजनांवरही चर्चा होणार आहे.प्रत्येक संघटनेच्या वतीने निवडक प्रतिनिधींमार्फत अचूक, अभ्यासपूर्ण व वस्तुनिष्ठ पद्धतीने समस्यांचे सादरीकरण करण्यात येणार असून, शासनाच्या धोरणांवर टीकात्मक भूमिका न घेता सकारात्मक बदलांच्या अपेक्षांवर भर दिला जाणार आहे.

# श्रीवर्धनमध्ये भूमिपूजन झाले, कामे मात्र रखडली; नागरिकांमध्ये नाराजी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन प्रतिनिधी :** श्रीवर्धन नगरपालिका निवडणुकीपूर्वी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने श्रीवर्धन शहर परिसरात विविध विकास कामांचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात करण्यात आले होते. सेल्फी पॉईंट उभारणी, जीवनेश्वर कोंड परिसरातील नदीलगत संरक्षण भिंत बांधकाम, तसेच ओझाळे पाखाडी येथील समुद्रकिनारी जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण अशा अनेक महत्त्वाच्या कामांचा यात समावेश होता. मात्र, निवडणुकीनंतर या कामांना अद्यापही प्रत्यक्ष सुरुवात झालेली नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सदर कामे पर्यटन आणि स्थानिकांच्या सोयीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. विशेषतः दांडा परिसरातील सेल्फी पॉईंट आणि समुद्रकिनारी जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण यामुळे पर्यटनाला चालना मिळेल, अशी अपेक्षा होती. तसेच जीवनेश्वर कोंड येथील संरक्षण भिंत ही पूर आणि समुद्राच्या भरतीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक मानली जात होती. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही कामे सुरू नसल्याने भूमिपूजन केवळ दिखावा ठरल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

दरम्यान, संबंधित यंत्रणांनी या कामांबाबत स्पष्ट भूमिका मांडावी आणि लवकरात लवकर कामांना सुरुवात करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.“निवडणुकीच्या काळात जनतेला मोठमोठी आश्वासने देऊन विकासकामांचे भूमिपूजन धूमधडाक्यात केले जाते. मात्र निवडणूक संपल्यानंतर त्या कामांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते. श्रीवर्धनमधील ही रखडलेली कामे हेच दर्शवतात की या पक्षाला जनतेच्या प्रश्नांपेक्षा केवळ राजकारणात अधिक रस आहे. आता दिलेले आश्वासनाची दखल घेऊन तातडीने ही कामे सुरू करावीत,” असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी श्रीवर्धन महिला शहर अध्यक्षा सौ. रुची बोरकर यांनी व्यक्त केले.

# सिद्धार्थ गौतम बुद्धाचा महार नाग गणांशी रक्तसंबंध आहे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका** : ज्या समाजात माझा जन्म झाला, त्या समाजाचा मला अभिमान आहे. कारण जर माझा समाज माझ्या पाठीशी उभा राहिला नसता, तर मी या स्तरापर्यंत पोहोचू शकलो नसतो. जर मी माझ्या समाजाला उच्च स्तरावर नेऊ शकलो नाही, तर मी स्वतःच्या हातांनी माझ्या छातीत गोळी घालून स्वतःला संपून घेईल—अशी प्रतिज्ञा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली होती. म्हणूनच त्यांनी आपल्या समाजाला उच्च स्तरावर नेण्याचा मार्ग खुला करून दिला आहे, आणि त्याच मार्गाने समाज पुढे जात आहे. यासाठी दिवस-रात्र परिश्रम करणारे लोक तयार झाले आहेत. हजारो संघटना हेच कार्य करीत आहेत; सगळे आपापल्या परीने प्रयत्न करत आहेत. त्याचपैकी हा एक किंचित प्रयास आहे.

समाजाला उच्च स्तरावर पोहोचण्यासाठी इतिहासाची आवश्यकता असते. त्याच्यामार्फत आपल्याला आपल्या पूर्वजांचा इतिहास समजतो. आपली संस्कृती कशी होती, याचे पुरावे आपल्याला पुरातत्व उत्खननातून मिळतात. यासाठी प्राचीन इतिहासाचा अभ्यास, चिंतन-मंथन व अंतर्ग्रथन आणि सखोल विश्लेषण करूनच सत्यता चे दर्शन होऊ शकते. म्हणून पुस्तके वाचणे आणि लेखन करणे अत्यंत आवश्यक आहे.

एका शुभेच्छुक धम्मबंधू मित्राने मला दूरध्वनीवर विचारले की, आपल्या समाजात कोणताही राजा दिसत नाही? आणि या उच्च कोटीच्या इतिहासाशी आपला काय संबंध आहे? हा प्रश्न माझ्या मनात वारंवार येत होता. याचे उत्तर खऱ्या इतिहासात आणि पुरातत्वातील दगडांमध्ये दडलेले आहे. आपल्या समाजाचा या उच्चस्तरीय इतिहासाशी नक्कीच जवळचा संबंध आहे.

मी दिलेले उत्तर सर्वांसाठी सोप्या शब्दांत लिहित आहे—जगात जर सर्वात पवित्र आणि उच्च कोटीचे तत्वज्ञान असेल, तर ते बुद्धाचे याशिवाय दुसरे कोणतेही दिसत नाही. म्हणून इतिहासकारांनी त्यांना “जगातील पूर्ण प्रबुद्ध” (Enlightened of the World) असे संबोधले आहे. ई.पू. ५६३ मध्ये त्यांचा जन्म हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या “कपिलवस्तु” या नगरात झाला. “कपिलवस्तु”च्या तीन दिशांना तीन प्रमुख राजनगरे होती—

१. महारहवाकोट (पश्चिम) २. तीतरहवाकोट (दक्षिण) ३. पिपरहवाकोट/ पिंपळवन (पूर्व)

ई.पू. सुमारे ६०० च्या आसपास राजा “शुद्धोधन” यांचे वडील राजा “सिंहहनुनाग” यांचा विवाह “महारहवाकोट” येथील राजकुमारी “कच्चायना” हिच्याशी झाला होता. राणी "कच्चायना" या सिद्धार्थ गौतम यांच्या "आजी" होत्या. “कच्चायना” या “महारहवाकोट” येथील “महार” नागराजाच्या कन्या होत्या. यावरून असे दिसते की “महार” लोक ई.पू. सुमारे ७०० च्या काळात नागवंशी होते आणि त्यांचा “बुद्ध” यांच्याशी रक्तसंबंध होता.

ऐतिहासिक दस्तावेजांनुसार “सिंहहनुनाग” यांचे वडील “जयसेननाग” होते. “महारहवाकोट” हे गांधार (अरियदेश) प्रदेशात स्थित होते, जे सुमारे २०५ वर्ग कि.मी. क्षेत्रात पसरले होते. या पुरास्थळाचा शोध इ.स. १९१६ मध्ये पुरातत्ववेत्ता "जॉन डेविड टी. ओस्ले" यांनी पाकिस्तान सीमेवरील “जलालाबाद”पासून १८ कि.मी. अंतरावर लावला. सुमारे २५ वर्ग कि.मी. क्षेत्रात पसरलेल्या या ठिकाणाहून जवळपास २९०० मौल्यवान बुद्धमूर्ती आणि अनेक मृद्भांड सामग्री सापडली. या मौल्यवान मूर्ती “डलास म्युझियम ऑफ आर्ट” (Dallas Museum of Art - DMA) येथे सुरक्षित प्रदर्शनार्थ ठेवण्यात आल्या आहेत.

उत्खननादरम्यान दोन शिलालेख मिळाले. त्यावर “देवानपिय असितेस्सी साकिया बौद्ध” असे कोरलेले आहे. दुसऱ्या शिलालेखात “भगवतो साकिया देवानपिय अहंम साकिया बौद्ध” असे उत्कीर्ण आहे. यावरून असे सिद्ध होते की “चंद्रगुप्त मौर्य” यांचे नातू सम्राट "अशोक" हे शाक्यवंशी बौद्ध होते, आणि त्यांचा संबंध “पिपरहवाकोट” (पिंपळवन)शी होता. याच ठिकाणी “अंगारा” स्तूपही सापडला आहे. उत्खननात बुद्धांचे मूळ अस्थी-अवशेष पुरातत्ववेत्ता विलियम पेपे यांना इ.स. १८९८ मध्ये प्राप्त झाले होते. या विषयाचे सविस्तर वर्णन संबंधित (नागवंश शौर्य पराक्रम) ग्रंथाच्या पृष्ठ २८७ वर दिले आहे. नागराजांच्या जीवनचरित्र किंवा त्यांच्या साम्राज्याशी संबंधित इतिहास मांडण्याचा आमचा उद्देश पुन्हा साम्राज्य व्यवस्था निर्माण करणे नाही, तर वर्तमान लोकशाही सुरक्षित ठेवणे हा आहे. तसेच भारताच्या इतिहासातील सुवर्णकाळ आणि त्या काळातील राज्यकारभार व गणराज्य पद्धती समजून घेणे आणि स्वीकारणे हे आमचे ध्येय आहे.

प्राचीन भारताच्या इतिहासात गणराज्य काळातील दोन सुवर्णयुगे मानली जातात— १. मौर्यकाल २. गुप्तकाल

या दोन्ही काळात राज्यव्यवस्थेत बौद्ध तत्वांचा समावेश होता. जे समाज गणराज्य पद्धतीने जगत होते, त्यांच्यात परंपरागत एकच राजा किंवा राजघराणे नव्हते. म्हणूनच आपल्या समाजात एखाद्या राजपुरुषाचा किंवा राजघराण्याचा उल्लेख आढळत नाही. या समाजाच्या गणराज्य व्यवस्थेत जगातील पहिले विद्यापीठे—तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, ओदंतपुरी, सोमपुरा, सिरपूर, अमरावती, सोपारा, इगतपुरी, वल्लभी आणि तेलहारा—यांची निर्मिती झाली होती.

सिद्धार्थ गौतम यांच्या माता “महामाया देवी” या देवदहचे राजा “अंजन” आणि राणी “सुलक्षणा” यांची कन्या होत्या, जे कोलिय नागवंशी होते. "देवदह"चे राजा “दंडपाणी” नाग यांचा विवाह राजा “शुद्धोधन” यांची बहीण आणि “सिंहहनुनाग” यांची कन्या “प्रमिता” हिच्याशी झाला होता. त्यांच्या कन्या “यशोधरा” (भद्रकच्चाना) हिचा विवाह “सिद्धार्थ गौतम” यांच्याशी झाला होता.

या प्रकारे शाक्य कुल नागवंशी असल्याचे दिसून येते. हे लोक परंपरेनुसार “सांख्यदर्शन” पाळत होते. हिमालयाच्या पायथ्याशी “सखुवा” नावाचा पक्षी आणि “साकिया” नावाचे वृक्षही आढळतात. यावरून शाक्य कुल नागवंशी (इक्ष्वाकु) वंशाशी संबंधित असल्याचे सूचित होते. हे “क्षत्रिय” नसून “खत्तिय” म्हणजे शेती करणारे लोक होते—हिंसक, विध्वंसक, लुटारू किंवा दडपशाही करणारे शासक नव्हते. हे श्रमण संस्कृती धारक श्रम करणारे समता पाडणारे होते.

जितके मनुष्य तितक्या त्यांच्या प्रवृत्ती असतात. परंतु बुद्धांच्या प्रभावामुळे राजकीय व्यक्तींच्या प्रवृत्ती उच्च स्तरावर गेल्या. त्याआधी सत्तेसाठी अत्याचार, शोषण, कपट, युद्ध, नरसंहार आणि पलायन यांसारख्या प्रवृत्ती प्रचलित होत्या. आजही अनेक ठिकाणी अशा परिस्थिती दिसतात. याचे मुख्य कारण म्हणजे आपल्याला “बुद्ध” यांच्यापासून दूर केले गेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला पुन्हा बुद्धांच्या जवळ आणून त्या उच्च स्तरावर जाण्याचा मार्ग दाखवला आहे. त्यामुळे त्या उच्च स्तराच्या खऱ्या इतिहासाचे ज्ञान आपल्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. वर्ष १९६९-७२ मधे नागपूर विद्यापीठ (भारतीय पुरा. विभाग) द्वारे झालेल्या उत्खननात अमूल्य अवशेष सापडले. त्यात ७२ संगमरमरी पाषाणावर गाथा उत्कीर्ण आहेत. त्या पैकी एक गाथा "आकासट्ठाच भूमट्ठा देवा नागा चथुपं वर बोधीमले धातयो सब्बदा I अरहू दक्खनिये नागपुरे अंजली करनिये जंबूदीपे तीथसपुरे तया पुयंता II नागलोके चथूपे महारं ससेन महतीत्वा परंती होत विजेत्वा III" या गाथेत पृथ्वीतलावर बुद्धाच्या धातू अवशेषावर निर्मित स्तूप अरिदेश (अरहू) कंबोज (अफगाण) व नागपूर (दक्षिण) चा संबंध दर्शविला आहे. संपूर्ण जंबुदीपात पसरलेले नाग राज्य व त्यांच्या शासक महारनागाचे शासन बुद्ध देवाच्या महत्व उपदेशाने निरंतर विजयी होत रहावे. हि कामना केली गेली आहे. या अनुसार पुरा. वेत्ता वी.डी. जोशी, प्रो. बालपदवाड आणि इति. प्रो. राजवाडे यांनी सिद्ध केले आहे कि ई.पू. ६०० च्या अंतर्गत नागपूर (पवनी) परिसरात नाग लोकांचे राज्य होते. दि. २४ जून १९९३ ला नागपूर लोकमत मधे हा अंक प्रकाशित झालेला आहे.

**शब्दांकन**

**- धम्मपाल देशभ्रतार**

# पाटोद्यात मोठ्या उत्साहात पार पडली बीटीएस परीक्षा; तालुक्यातील ३१७ विद्यार्थ्यांचा सहभाग

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :-** सध्याच्या स्पर्धेच्या युगात बालवयापासूनच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा. या उद्देशातून त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी, या हेतूने पाटोदा येथील ओम कोचिंग क्लासेस चे संचालक प्रा. सोमीनाथ खंडागळे यांच्या समन्वयातून रविवारी रोजी एज्युमेट अकॅडमी संचलित भारत टॅलेंट सर्च ही परीक्षा पार पडली. पाटोदा शहरातील केंद्रावर तब्बल ३१७ विद्यार्थ्यांनी या परीक्षेतून आपले टॅलेंट आजमावले आहे. सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी माहिती असणे गरजेचे आहे. या हेतूने गतवर्षीपासून बी टी एस म्हणजेच भारत



टॅलेंट सर्च ही बालवयासाठी जनरल नॉलेज तसेच इतर उपयुक्त विषयांवर आधारित स्पर्धा परीक्षा घेण्यात येते. पहिली ते आठवीचे विद्यार्थी या परीक्षेमध्ये सहभागी होतात. या परीक्षांमध्ये भाषा परिसर अभ्यास भाषा गणित विज्ञान भूगोल अशा विषयांमध्ये परीक्षा होते. पहिलीच्या विद्यार्थ्यांना केवळ भाषा गणित आणि परिसर अभ्यास दुसरीच्या विद्यार्थ्यांनाही भाषा गणित परिसर अभ्यास तिसरी चौथी भाषा गणित परिसर अभ्यास पाचवी ते सहावी भाषा गणित विज्ञान भूगोल तर सातवी ते आठवीतील विद्यार्थ्यांना भाषा गणित विज्ञान भूगोल या विषयांवर आधारित ५० ते ७५ प्रश्न संख्या यामध्ये विचारली जाते तर १०० ते १५० गुणांची ही परीक्षा प्रत्येक वर्षी घेण्यात येत आहे. पाटोदा तालुक्यात या परीक्षेला विद्यार्थ्यांकडून आता चांगला प्रतिसाद मिळत असून यंदा तब्बल ३१७ विद्यार्थ्यांनी पाटोदा शहरातील संत बाळूदेव महाराज विद्यालयात ३१७ विद्यार्थ्यांनी बीटीएस परीक्षा दिली. या परीक्षेसाठी संत बाळूदेव महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंदांचे तसेच तालुकाभरातून आलेल्या शिक्षकांचे अनमोल सहकार्य मिळाले.

**विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप माहित होते; चांगला प्रतिसाद...**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार जीवनाभियोग शिक्षण देणारे पहिले पाऊल म्हणून बीटीएस ही परीक्षा घेण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ व्हावी यासाठी ही परीक्षा आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये राज्यस्तरीय जिल्हास्तरीय अशी बक्षिसे देण्यात येणार असून सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप माहिती व्हावे याच उद्देशाने या परीक्षेचे आयोजन आपण करत आहोत पाटोदा तालुक्यात विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.**

**प्रा.सोमीनाथ खंडागळे,**
**परीक्षा समन्वयक पाटोदा**

## अखेर प्रहाराच्या पाठपुरव्याला यश, नियमबाह्य पद्धतीने काम करणाऱ्या २८ सेवानिवृत्त अधिकारी यांची सेवा समाप्त करण्याचे आदेश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ,( वार्ताहर ) :** पनवेल महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाने प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी पाच वर्षा पूर्वी विविध संवर्गातील अनेक सेवा निवृत्त अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक केली होती होती. परंतु महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार जास्तीत जास्त ३ वर्षा सेवा काळ असल्याचे नियम असताना व त्यांचे कार्यकाळ संपल्यानंतर ते नियमबाह्य पद्धतीने काम करत होते व पालिकेच्या आस्थापना विभागाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून या सेवानिवृत्त २८ अधिकाऱ्यांची सेवा सुरू ठेवून जनतेच्या पैशाचे अपव्यय केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर ही बाब गंभीर असल्याने पालिकेच्या पर्यायाने जनतेच्या पैशाची उधळपट्टी चुकीच्या पद्धतीने होत असल्याने प्रहाराने पनवेल आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेऊन या प्रकरणी सखोल चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली होती. या प्रकरणी प्रहारच्या वतीने पालिका आयुक्तांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्या नंतर आस्थापना विभागाने या नियमबाह्य पद्धतीने काम करणाऱ्या २८ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना नोटीस बजावून अखेर त्यांची सेवा समाप्ती करण्याचे आदेश निर्गमित केले असल्याची माहिती डॉ. सुनील शिरीषकर, जिल्हा उपाध्यक्ष रायगड प्रहार जनशक्ती पक्ष यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## मोटारीच्या काचा फोडणाऱ्या गुन्हेगारांला अटक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** खारघर परिसरात, विशेषता इस्कॉन मंदिर परिसरात उभ्या असलेल्या मोटारीच्या काचा फोडून होणाऱ्या चोऱ्यांमुळे नागरिक हैराण झाले होते, खारघर पोलिसांनी अत्यंत कौशल्याने सापळा रचून या टोळीतील मुख्य सूत्रधाराला नुकतीच अटक केली आहे. या कारवाईमुळे केवळ खारघरच नव्हे, तर सीबीडी, पनवेल शिळ डायघर आणि मिरा-भाईंदरमधील ७ गुन्हे उघडकीस आले आहेत.खारघर इस्कॉन मंदिर परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोटारोंच्या काचा फोडून आतील मौल्यवान ऐवज लंपास करण्याचे प्रमाण वाढले होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने या भागाचा सखोल अभ्यास केला. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने या परिसरात सापळा रचला. चोरी करण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी रज्ञा उर्फ रझाक इसरार खान (३६) या आरोपीवर झडप घालून त्याला ताब्यात घेतले. रझाक हा कल्याण परिसरातील गोवेली येथील रहिवासी असून, तो पानविक्रीचा व्यवसाय करतो .

## मुलीवर अत्याचार, तरुणाला नेपाळ सीमेवर अटक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** खारघर येथील एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती करणाऱ्या फरार आरोपीला अटक करण्यात खारघर पोलिसांना यश आले आहे. विशाल बाबू उर्फ अन्वर अली इम्तियाज अन्सारी (२४) असे या आरोपीचे नाव असून, पोलिसांनी त्याला भारत-नेपाळ सीमेवरून शिताफीने अटक केली आहे. न्यायालयाने या आरोपीला १ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. खारघरमधील जगदीश ऑटोपार्ट्स व्या गॅरेजमध्ये काम करणाऱ्या विशाल चावू याने ऑक्टोबर २०२५ मध्ये पीडित मुलीला गॅरेजमध्ये बोलावून तिच्यावर अत्याचार केले होते. कुणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन त्याने पीडित मुलीवर अनेकवेळा लैंगिक अत्याचार केले होते. त्यामुळे पीडित मुलगी गर्भवती राहिल्याचे समोर आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली होती. त्यानंतर पीडित मुलीच्या पालकांनी खारघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर आरोपी हा उत्तर प्रदेशातील कुशीनगर या आपल्या मूळ गावी पळून गेला होता. पोलिसांनी उत्तर प्रदेशात जाऊन नातेवाईकांवर दबाव निर्माण करून आणि त्यांना विश्वासात घेऊन सलग १३ दिवस कुशीनगर, गोरखपूर आणि नेपाळ सीमा परिसरात शोधमोहीम राबवली. अखेर पोलिसांनी विशाल बाबू याला नेपाळ सीमेजवळून अटक केली.

## ६५ हजारांच्या ऐवजाची कंपनीतून चोरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** नवीन पनवेल कंपनीचे लॉक तोडून अज्ञात चोरट्यांत तेथून ६५ हजारांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली. या प्रकरणी तळोजा पोलीय ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाशिफा हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड, तळोजा, एमआयडीसी या कंपनीच्या दरवाजाचे लॉक तोडून चोरांनी आतमध्ये प्रवेश केला आणि औषधे बनवण्याचे व पॅकिंग करण्याचे मशीनचे स्पेअरपार्टचे बॉक्स, कॉपर केबल, कॉपर पाइप लाइन, कोपर कॉम्प्रेसरचे बॉक्स, आदी ऐवज चोरून नेल्याची तक्रार या कंपनीच्या वतीने तळोजा पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंद करुन पुढील तपासाला सुरुवात केल्याचे तळोजा पोलिसांच्यावतीने सांगण्यात आले आहे.

## सिमेंटच्या १२० बेंगांचा अपहार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** नवीन पनवेल एका ट्रक चालकाने त्याच्या ताब्यातील ५४ हजार ८८० रुपयांच्या सिमेंटच्या १२० बैंगांचा अपहार केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. इमाम हुसेन शेख असे या एक चालकाचे नाव आहे इमाम गाने कळंबोली येथील कंपनीमधून सिमेंटच्या २४० बंगा पश्चिम येथे घेऊन जाण्यासाठी भरल्या होत्या. मात्र, त्याने १२० सिमेंट बॅग खाली केल्याचे चलन पाठवले. त्यानंतर त्याने कळंबोली येथील पार्किंगमध्ये ट्रक पार्क करून चावी कंपनीच्या ऑफिसमध्ये जमा करून निघुन गेला. या वेळी ट्रकची तपासण केली असता, त्यात उर्वरीत सिमेंटच्या १२० बॅग सापडू आल्या नाहीत. या प्रकरणी इमार शेख याच्याकडे विचारणा केल असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. या प्रकरणी कळंबोल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शेलघर येथे एम जी ट्रॉफीला निलेश कुलकर्णी यांच्या उपस्थितीने चार चांद !

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** शेलघर येथे प्रकाश झोतातील भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे विजेत्यांना २१ बाईक असलेली क्रिकेट स्पर्धा जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली आहे. या स्पर्धेला भारताचे माजी डावखुरे फिरकी गोलंदाज निलेश कुलकर्णी यांनी उपस्थित राहून एम जी ट्रॉफीला चार चांद लावले आहेत.

निलेश कुलकर्णी यांनी १९९७ मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. आपल्या कारकिर्दीतील पहिल्याच चेंडूवर बळी (विकेट) घेणारे ते पहिले भारतीय गोलंदाज ठरले. मुंबई संघाकडून खेळताना, त्यांनी बडोदा संघाचे १० बळी अवघ्या १२० धावांत घेतले होते.

आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी एम जी ट्रॉफीला आलेले निलेश कुलकर्णी यांचे फटाक्यांच्या आतषबाजीने शनिवारी (ता. २८ ) स्वागत केले. त्यानंतर शाल आणि सन्मानचिन्ह देऊन महेंद्रशेठ घरत यांनी निलेश कुलकर्णी यांचा सन्मान केला.



यावेळी निलेश कुलकर्णी म्हणाले, "खेळ कोणताही असो, त्यासाठी मी सर्व प्रकारचे सहकार्य करायला तयार आहे. महेंद्रशेठ घरत यांच्या सौजन्याने आयोजित एम जी ट्रॉफीचे सामने आणि भव्य मैदान पाहून मनापासून आनंद झाला आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी होत असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. प्राथमिक सुविधा नसतानाही मी त्याकाळी क्रिकेटवर जिवापाड प्रेम करून खेळलो. तहानभूक माहित नसायची. अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मी मात केली. त्यामुळे भारतीय संघात स्थान मिळवू शकलो. त्यामुळे आजही मी क्रिकेटची सेवा करतोय. खेळाडूंना घडवतोय."

## सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ आणि पुष्पक चिरमाडे कॅन्सर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने थर्मल मॅमोग्राफीद्वारे मोफत स्तन कर्करोग तपासणी शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल , ( वार्ताहर ) :** सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ आणि पुष्पक चिरमाडे कॅन्सर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून थर्मल मॅमोग्राफीद्वारे मोफत स्तन कर्करोग तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.या उपक्रमात कॅन्सर तज्ज्ञ डॉ. पुष्पक चिरमाडे (MD, DM Oncology) यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच सौ. विजया सावंत, प्रिया खोबरेकर आणि प्रीता भोजने यांनी शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी विशेष मेहनत घेतली. मंडळातील महिला भगिनींनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मोलाची साथ दिली. यावेळी डॉ. ज्योती चिरमाडे (MD, DM Hemato-Oncologist) यांनी स्तन



कर्करोगासह विविध कॅन्सरचे उपचार, तसेच मानसिकदृष्ट्या खंबीर राहून या आजारावर मात कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. मालती चिरमाडे यांनी महिलांनी आपल्या जीवनशैलीत योग्य बदल करून वयोमानानुसार आरोग्य सुदृढ कसे ठेवावे, याबाबत उपयुक्त माहिती दिली. या शिबिरात एकूण ४६ महिलांनी थर्मल मॅमोग्राफी तपासणी करून घेतली. सर्व तपासण्या पुष्पक चिरमाडे कॅन्सर सेंटरतर्फे पूर्णतः मोफत करण्यात आल्या. याबद्दल संघाचे अध्यक्ष केशव राणे यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रम कौटुंबिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला असून, महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा हा उपक्रम यशस्वी ठरला.

## स्त्री : संघर्ष ते स्वराज्य' : स्त्रीशक्ती मंचचा चौथा विशेषांक महिलांच्या स्वकर्तृत्वाचा गौरव




छत्रपती संभाजीनगर येथील 'स्त्री शक्ती मंच'तर्फे एप्रिल २०२६ मध्ये 'स्त्री: संघर्ष ते स्वराज्य' या नावाने चौथा विशेषांक प्रकाशित होत आहे. या अंकात महाराष्ट्र राज्यातील विविध भागांतील सुमारे १०० साहित्यिकांचे लेखन समाविष्ट करण्यात आले आहे. 'स्वराज्य' हा शब्द ऐतिहासिक संदर्भाऐवजी स्त्रीने आपल्या आयुष्यातील अन्याय, आव्हाने आणि संकटांना सामोरे जात स्वतःचे स्वकर्तृत्व घडविण्याच्या अर्थाने मांडण्यात आला आहे. संपादक चंद्रकांत तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या या अंकात राज्यभरातील कार्यकारी संपादक महिलांचे मोलाचे योगदान लाभले आहे. यात पुणे जिल्ह्यातून प्रसिद्धी प्रमुख म्हणून सौ. वसुधा वैभव नाईक यांचे मोलाचे योगदान या अंकासाठी लाभले आहे. महिलांच्या सक्षमीकरण, बळकटीकरण आणि त्यांच्या साहित्याला व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. हे सलग चौथे वर्ष आहे. प्रेरणादायी लेख, कथा आणि अनुभवांनी समृद्ध असा हा विशेषांक स्त्रीशक्तीचा आत्मविश्वास अधोरेखित करणारा ठरणार असून, प्रकाशनापूर्वीच वाचकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

**वसुधा वैभव नाईक, पुणे**

## उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांची अण्णा बनसोडे यांच्या शिष्टमंडळाने घेतली सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी/अरविंद बनसोडे कुरनूरकर:** आज भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांची महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या शिष्टमंडळाने उपराष्ट्रपती भवन येथे सदिच्छा भेट घेतली.

आज या भेटीत १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त चैत्यभूमी येथे उपस्थित राहण्याची विनंती उपराष्ट्रपतींना करण्यात आली. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत उपराष्ट्रपतींनी तत्काळ होकार दर्शवला.

यावेळी त्यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून कार्यरत असताना चैत्यभूमीला दिलेल्या भेटींच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच दादर येथे सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक कामाबाबतही त्यांनी शिष्टमंडळाकडे माहिती घेतली.



स्मारकाच्या कामाला अधिक गती मिळावी यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी शिष्टमंडळाकडून उपराष्ट्रपतींना गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या.

या भेटीत सुनील मगरे, सिद्धार्थ बनसोडे, नागसेन कांबळे, भदंत राहुल बोधी, बाळासाहेब करडक, आनंद चंदनशिवे, संजय अवसरमोल, शिल्पकार अनिल सुतार,सुबोध भारत, विजय अंभुरे आणि रामनाथ दवणे आदी उपस्थित होते.

## श्री 1008 भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव उत्साहात साजरा; प.पू. विश्रुत सागरजी महाराज ससंघ सान्निध्यात भक्तिमय वातावरण

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी** मालेगांव येथील दिगंबर जैन मंदिर येथील जन्म कल्याणक महोत्सव शांततेत पार ज्ञान, दर्शन, चारित्र्य, अहिंसा, शां ती, जगा आणि जगू द्या, अपरिग्रह यांची सबंध जगाला शिकवण देणारे जैन संप्रदायाचे 24 वे तिर्थंकर श्री 1008 भगवान महावीर स्वामींचा जन्मकल्याणक महोत्सव 30 मार्च सोमवार ला मालेगांव येथे शांततेत पार पडला मालेगांव परिसरातील सकल जैन समाजाच्या बंधू भगिनींनी स्थानिक मुख्य मार्गावरील श्री 1008 भगवान महावीरांचा शांततेचा संदेश देणारी मिरवणूक शहराच्या मुख्य मार्गावरून काढण्यात आली या मिरवणुकीत सर्व समाजाच्या बंधू भगिनी तसेच बालगोपाल मोठ्या संख्येने सहभागी झाले होते यावेळी मालेगांव चे उदयोगपती अभिषेक मुंदडा , मालेगाव नगरपंचायत चे नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे , उपाध्यक्ष राधा खवले व नगरसेवक गणेश अहिर , नगरसेवक सन्नी घुगे , नगरसेवक अभि घुगे , नगरसेवक अंकुश गुजरे , नगरसेवक संजय सारडा व माजी नगराध्यक्ष अरुण बळी, बाळा सावंत , गफ्फार शाह , चैतन्य भुरे उदय तोंडे , विशाल बनचरे , महेश भुतडा व इत्यादी पदाधिकारी यांनी श्री 1008 भगवान महावीर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले श्री 1008 भगवान महावीर यांची मिरवणूक पहिल्यांदा गुरुदेवांच्या सान्निध्यात अतिशय भक्तिमय वातावरणात मिरवणुकी दरम्यान परिधान केलेल्या लहान मुला-मुलींनी आकर्षक देखावे साकारले होते. या उपक्रमास शहरवासीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला श्री 1008 भगवान महावीरांचा संदेश देणारी मिरवणूक जैन मंदीर पासुन माळी वेटाळ ,खवले वेटाळ, पांडे वेटाळ, शिव चौक, गांधी चौक, मेडीकल चौक, जुने बसस्टॉप ,पोलीस स्टेशन समोरून, जोगदंड हॉस्पीटल, दुर्गा चौक ते जैन मंदीर जवळ पोहोचली या मिरवणुकी दरम्यान ठिकठिकाणी थंड पाण्याची व्यवस्था



करण्यात आली होती मिरवणूक जैन मंदिरात आल्यानंतर तिथे श्री 1008 भगवान महावीर प्रतिमेचा अभिषेक करण्यात आला त्यानंतर उपाध्याय मुनिश्री 108 विश्रुत सागर महाराज , मुनिश्री 108 निर्वेग सागर महाराज यांनी प्रवचन करण्यात आले आयोजित कार्यक्रमात श्री 1008 भगवान महावीर भगवंताची आरती करण्यात आली व तसेच महाप्रसाद सहभोजनाचा कार्यक्रम सकल जैन समाजातर्फे आयोजित करण्यात आला श्री 1008 भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव निमीत्त सकाळी 6.30 ला मंदिरात अभिषेक, पुजन व 8.30 ला शोभायात्रा (मिरवणूक) तसेच आले आजु बाजुच्या खेडेगाव ब्राम्हणवाडा , नधांना , राजुरा , मारसुळ , चिवरा , घाटा , जऊळका , येथील सकल जैन समाजाच्या बांधवांनी ही येऊन श्री 1008 भगवान महावीर स्वामी जन्मकल्याण शोभायात्रेत मोठया संखेने सहभाग घेतला तसेच मालेगांव पोलीस निरिक्षक राजेश खेरडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता ...

# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये कॉक्लियर इम्प्लांट क्लिनिकचा शुभारंभ; कॉक्लियर इम्प्लांटद्वारे रुग्णांना श्रवणक्षमता परत मिळवण्याची संधी

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई:प्रतिनिधी :** श्रवणदोषाचे वेळीच निदान आणि प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी *मेडिकव्हर हॉस्पिटलने विशेष कॉक्लियर इम्प्लांट क्लिनिक सुरू केले आहे. हा उपक्रम जन्मजात दोषामुळे बोलू न शकणाऱ्या मुलांसाठी, तसेच ज्या प्रौढांना श्रवणयंत्रांचाही फायदा होत नाही त्यांच्यासाठी प्रभावी उपचार प्रदान करणार आहे,* ज्यामुळे त्यांना त्यांची श्रवणक्षमता आणि संवाद कौशल्ये सुधारण्यास नक्कीच मदत होईल. प्रगत निदान तंत्रज्ञान , शस्त्रक्रियेतील कौशल्य आणि शस्त्रक्रियेनंतरचे रुग्णास लागणारी मदत, ही मुलांमध्ये वेळीच उपचार आणि उत्तम परिणाम सुनिश्चित करणे हे या क्लिनिकचे मुख्य उद्दिष्ट आहे.

नवी मुंबईतील ४ वर्षांच्या रोहित खन्नाला (नाव बदलले आहे) त्याचे पालक मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी घेऊन आले होते.* त्याला ऐकू येत नसल्याची आणि त्याच्या वयाच्या इतर मुलांप्रमाणे तो बोलू शकत नसल्याची चिंता त्याच्या पालकांना सतावत होती. BERA सह एक सखोल तपासणी करण्यात आले, ज्यातून दोन्ही कानांमध्ये तीव्र श्रवणदोष असल्याचे निदान झाले. याचा अर्थ, ते मूल बोलण्याच्या विकासासाठी आवश्यक असलेले आवाजच ऐकू शकत नव्हते. दोन वर्षांपूर्वी म्हणजेच वयाच्या दुसऱ्या वर्षी, त्या मुलाला पहिल्यांदा दोन्ही कानांमध्ये तीव्र श्रवणदोष असल्याचे निदान झाले होते. रुग्णाच्या कुटुंबाला उपचारांच्या पर्यायांविषयी समुपदेशन करण्यात आले. कुटुंबासाठी, हे निदान भावनिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत त्रासदायक होते. कॉक्लियर इम्प्लांटेशन, तीव्र श्रवणदोष असलेल्या मुलांसाठी सर्वात प्रभावी उपचार, ही एक खर्चिक प्रक्रिया आहे ज्यासाठी त्याच्या पालकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. हॉस्पिटल टीमच्या



पाठिंब्याने आणि मार्गदर्शनाने, 'द हान्स फाउंडेशन'च्या मदतीने ते कुटुंब या साऱ्या आव्हानांवर मात करू शकले, ज्यामुळे या चिमुकल्याचा नव्या आयुष्याचा प्रवास सुरु झाला. त्यानंतर हॉस्पिटलमध्ये या बालरुग्णावर उजव्या बाजूच्या कॉक्लियर इम्प्लांटची शस्त्रक्रिया करण्यात आली. ही प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली, ज्यामुळे मुलाला श्रवण क्षमता परत मिळाली. येत्या काही महिन्यांत या रुग्णाला नियमित श्रवण प्रशिक्षण आणि स्पीच थेरपीची दिसी जाईल. आता त्या बालरुग्णाला पहिल्यांदाच ऐकण्याची, बोलण्याची, भाषा शिकण्याची आणि विविध आवाजांचा अनुभव घेण्याची संधी मिळाली आहे, ज्यामुळे संवाद, शिक्षण आणि उज्ज्वल भविष्याचे मार्ग खुले झाले आहेत. नव्याने सुरू झालेल्या या क्लिनिकचा उद्देश हा आहे की, अशा अधिकाधिक मुलांना वेळीच निदान, योग्य उपचार आणि उत्तम जीवनमान जगण्याची संधी मिळावी.

क्लिनिकमध्ये विविध सेवा दिल्या जातात, ज्यात OAE, BERA, आणि ASSR सारख्या सखोल श्रवण तपासण्या, तसेच श्रवणयंत्राच्या चाचण्या आणि रुग्ण इंम्प्लांटकरिता पात्र आहे की नाही हे ठरविण्यासाठी पात्रतेचे मूल्यांकन करण्यात आले. रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबियांना योग्य उपचार पर्याय निवडण्यास मदत करण्यासाठी याठिकाणी तज्ज्ञांकडून योग्य मार्गदर्शनही केले जाते. पात्र रुग्णांसाठी, प्रगत कॉक्लियर इम्प्लांट प्रक्रियेपूर्वी सीटी (CT) आणि एमआरआय (MRI) तपासणी केली जाते. रुग्णांना इम्प्लांटशी जुळवून घेण्यास आणि श्रवण व संवाद कौशल्य सुधारण्यास मदत करण्यासाठी, क्लिनिक शस्त्रक्रियेनंतरच्या प्रोग्रामिंग (मॅपिंग) आणि बोलणे व ऐकणे यावसारख्या क्रियांवर विशेष लक्ष केंद्रित करते. जन्मजात किंवा लहान वयात श्रवणदोष असलेल्या मुलांमध्ये वेळीच निदान आणि उपचार करणे खुप गरजेचे आहे.

डॉ. राजेंद्र वाघेला(ईएनटी आणि एंडोस्कोपिक सर्जन - मेडिकव्हर हॉस्पिटल), म्हणाले,* किशोरवयीन आणि जन्मजात मुलांमध्ये श्रवणदोषासारख्या अनुवांशिक स्थितीमुळे,गर्भधारणेदरम्यानच्या संसर्गामुळे (जसे की रुबेला किंवा सीएमव्ही), किंवा जन्मावेळीच्या गुंतागुंतीमुळे, जसे की ऑक्सिजन पातळी कमी होणे किंवा मुदतपूर्व प्रसूती होऊ शकते. लहानपणी कानाच्या संसर्गामुळे किंवा काही विशिष्ट औषधांमुळेही हे होऊ शकते. श्रवणदोषाचा परिणाम संवाद, शिक्षण आणि जीवनाच्या एकूण गुणवत्तेवर होऊ शकतो. ज्या व्यक्तींना श्रवणयंत्रांचा (हियरिंग एड्स) फायदा होत नाही, अशा तीव्र श्रवणदोष असलेल्या व्यक्तींसाठी कॉक्लियर इम्प्लांट हा एक जीवन बदलणारा उपाय आहे. यासाठी पात्र रुग्ण जाणून घेण्यासाठी संपूर्ण तपासणी केली जाते आणि या प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर रुग्णाच्या कुटुंबियांना मार्गदर्शन करतो. वेळीच उपचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण वेळीच उपचार केल्यास बोलणे आणि भाषा अवगत करण्याच्या कौशल्यात मोठ्या प्रमाणात सुधारणा होऊ शकते आणि त्यानंतर अशा व्यक्तींना कोणावर अवलंबून न राहता स्वतंत्रपणे जगण्याची संधी आणि आत्मविश्वास मिळतो.

डॉ. राजेंद्र वाघेला पुढे सांगतात, कॉक्लियर इम्प्लांट ही केवळ एक शस्त्रक्रिया नाही; त्यासाठी शस्त्रक्रियेनंतरचे मॅपिंग आणि पुनर्वसनाद्वारे सतत मदतीची आवश्यकता असते. रुग्णांना सर्वोत्तम उपचार मिळावेत यासाठी आमचे हे क्लिनिक एकाच छताखाली समुपदेशन, थेरपी आणि नियमित फॉलो-अपची सुविधा उपलब्ध करुन देते. गरजू कुटुंबांना आर्थिक मदतीच्या पर्यायांविषयी माहिती देणे, त्यांना आर्थिक बाबतीत पाठबळ दिले जातात ज्यामुळे प्रगत श्रवण उपचार अधिक सुलभ आणि सोपे होतात.

एकाच छताखाली संपूर्ण श्रवण उपचार उपलब्ध करुन देत रुग्णांना अधिक चांगली श्रवण क्षमता मिळवून देणे आणि त्यांना प्रभावीपणे संवाद साधण्यास मदत करणे हे आमचे ध्येय आहे *असे *खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्स केंद्र प्रमुख संदीप जोशी यांनी स्पष्ट केले.

# लोना इंडस्ट्रीज संबंधित कामगार संघर्षाची कसोटी सकारात्मक दिशेला

## निर्णयाला महिन्याच आश्वासन ; श्रुती म्हात्रे यांचा आत्मदहनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी ;** रसायनी येथील लोना इंडस्ट्रीज लि. मधील कंत्राटी कामगारांच्या न्याय हक्काच्या लढ्याला अखेर सकारात्मक दिशा मिळाली असून, कंपनी व्यवस्थापनाने एक महिन्याच्या आत ठोस निर्णय घेण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. मात्र, आश्वासनाची पूर्तता न झाल्यास उग्र आंदोलनासह आत्मदहनाचा इशारा देत कामगार नेत्या श्रुती म्हात्रे यांनी व्यवस्थापनावर तीव्र दबाव कायम ठेवला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून विविध कंत्राटदारांमार्फत सेवा देणाऱ्या कामगारांना कंपनीच्या थेट पे-रोलवर घेण्यात यावे, तसेच शासन नियमानुसार वेतनवाढ व मूलभूत सुविधा मिळाव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी कोकण श्रमिक संघाच्या वतीने साखळी उपोषणाचा इशारा देण्यात आला होता. १७ ते १८ वर्षे निष्ठेने सेवा बजावणाऱ्या या कामगारांवर अन्याय होत असल्याची भावना यावेळी तीव्र झालेली पाहायला मिळाली.

आज दि. ३० मार्च २०२६ रोजी कंपनी गेटसमोर आंदोलनाची ठिणगी पडण्याआधीच पोलिस प्रशासनाने मध्यस्थी करत सकारात्मक भूमिका घेतली. उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल व वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ





यांच्या उपस्थितीत कामगार नेत्या श्रुती म्हात्रे व कंपनीचे वरिष्ठ अधिकारी संदीप गुप्ते व रमेश बर्गे या दोन्ही जनरल मॅनेजर आणि मानव संसाधन विभाग विकास भगत व समीर भालेकर यांच्यात तब्बल २ ते ३ तास सखोल चर्चा पार पडली.

या चर्चेत २२ कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवर तोडगा निघाला असून, टप्प्याटप्प्याने सर्व कामगारांना कायमस्वरूपी करण्यासह त्यांच्या वेतन व सुविधा संदर्भातील मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन कंपनीकडून देण्यात आले. मात्र, या आश्वासनावर समाधान मानत असतानाही कामगार नेत्या श्रुती म्हात्रे यांनी स्पष्ट इशारा दिला की, "जर कंपनीने पुन्हा चालढकल केली, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. गरज पडल्यास आत्मदहनासारख्या टोकाच्या पावलालाही सामोरे जावे लागेल."या आंदोलनात स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत कामगारांच्या लढ्याला पाठिंबा दर्शवला. संघर्षाच्या या टप्प्यावर कामगारांच्या ऐक्याची ताकद स्पष्टपणे दिसून आली.

दरम्यान, कामगार प्रतिनिधी सचिन मते यांनी प्रशासन व व्यवस्थापनाने संवादाची दारे उघडी ठेवत कामगारांना न्याय मिळवून देण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

या आंदोलनात सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड , मा. प. समिती जगदीश पवार ,मा. उपसरपंच रिया माळी ,मालती वाघमारे, मा.सरपंच शिवाजी माळी,संतोष वाघमारे ,संदिप दळवी, विनायक भोईर ,संदेश मते ,अजित माळी,विश्वनाथ गायकवाड, प्रकाश वाढवे, राजेश माळी ,बंडू मांडवकर , विकी पाठारे , नित्यानंद म्हात्रे, राजू माळी ,अविनाश कोंडलकर, विनोद कांबळे , जयवंत पाटील, दत्तात्रेय गरुडे आदी मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.कामगारांच्या हक्कासाठी उभा राहिलेला हा संघर्ष आता निर्णायक टप्प्यात पोहोचला असून, दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी होते का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# कॉंग्रेसला साथ देण्याची गरज : डॉ. रागिणी नायक

## कर्जत, खोपोलीच्या काँग्रेस कार्यकर्त्यांना महेंद्रशेठ घरत यांचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** कॉंग्रेसला पुन्हा उभारी देण्यासाठी नेहरू गांधी यांच्या विचारांची गरज आहे. सध्या प्रतिकूल परिस्थितीत कॉंग्रेसला साथ देण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे, असे आवाहन राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक यांनी केले. कर्जत तालुका काँग्रेस कमिटीच्या बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी चर्चा केली.

प्रदेश काँग्रेसच्या संगठन सृजन अभियानानिमित्ताने कर्जत तालुका काँग्रेस



कमिटीच्या बैठकीचे आयोजन नेरळ येथील साने हॉल येथे करण्यात आले होते.

यावेळी रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, "कॉंग्रेस हा सर्वात जुना पक्ष आहे.

पक्षाची विचारधारा घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे. सध्या रायगड जिल्ह्यात प्रतिकूल परिस्थितीत आपण कार्यकर्त्यांच्या बळावर चांगले यश संपादन करीत आहोत. येत्या काळात पक्षाच्या वाढीसाठी आपणा सर्वांना हातात हात घालून काम करायचे आहे."

यावेळी पक्षाच्या निरीक्षक राष्ट्रीय प्रवक्ता रागिणी नायक,पक्षाच्या प्रदेश कार्यालयाचे निरीक्षक आणि प्रदेश सरचिटणीस प्रदीप राव,मनीष गणोरे,पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत,महिला जिल्हा अध्यक्ष ॲड. श्रद्धा ठाकूर, सरचिटणीस मिलिंद पाडगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# बुवाबाजीविरोधात पनवेल येथील संविधान कट्ट्यावर निषेध निदर्शन"

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** रविवार, दिनांक २९ मार्च २०२६ रोजी बुवाबाजीच्या माध्यमातून महिलांचे शोषण करणाऱ्या अशोक खरात या व्यक्तीवर तातडीने आणि कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच पीडित महिलांना न्याय मिळवून द्यावा, या मागणीसाठी संविधानप्रेमी नागरिकांच्या वतीने आज संविधान कट्टा, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे निषेध सभा आयोजित करण्यात आली.

समाजातील अंधश्रद्धा, अन्याय आणि महिलांवरील अत्याचारांविरोधात एकत्र



येऊन जागृती निर्माण करण्याचा निर्धार उपस्थितांनी या प्रसंगी व्यक्त केला.

या वेळी मा. मारुती शेरकर, अरविंद लोहार, विजय मोरे आणि प्रवीण जठार हे उपस्थित होते. त्यांनी संविधानाच्या मूल्यांवर आधारित सामाजिक परिवर्तनाची गरज अधोरेखित करत, दोषींवर तातडीने कारवाई व्हावी अशी ठाम मागणी केली. दरम्यान, "अंधश्रद्धा मोडू या, विचारांनी जोडू या!" अशा घोषणा देण्यात आल्या .ही सभा शांततापूर्ण वातावरणात पार पडली असून, उपस्थित संविधानप्रेमी नागरिकांनी आगामी काळात अंधश्रद्धा आणि महिलांवरील अन्यायाविरुद्ध कायदेशीर मार्गाने लढा सुरू ठेवण्याचा संकल्प केला.

# केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षात प्रा .जीवन जाधव,डॉ .रश्मी जाधव व डॉ .प्रा .गौतम बेंगाळे यांचा प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी : राष्ट्र**वादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते प्रा. जीवन जाधव, महिला सरचिटणीस डॉ. रश्मी जीवन जाधव तसेच लॉर्ड बुध्दा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी निर्माण कृती समितीचे प्रमुख संयोजक डॉ.प्रा.गौतम बेंगाळे यांनी आपल्या समर्थकांसह रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत रिपब्लिकन पक्ष ऑफ इंडिया या

पक्षात प्रवेश केला.रामदास आठवले यांनी त्यांच्या गळयात निळया पट्टा घालून त्यांचे स्वागत केले.डॉ प्रा.गौतम बेंगाळे यांनी रामदास आठवले यांचा मानपत्र देऊन त्यांचा सत्कार केला.व शासनाने पुणे येथील पुरंदर तालुक्यातील मौजे घेरा येथे लॉर्ड बुद्धा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी स्थापन करावी अशी मागणी पत्राद्वारे केली. विक्रोळी कन्नमवार नगरातील विकास हायस्कूल सभागृहात हा पक्ष प्रवेश सोहळा रविवारी दि.२९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता



मोठ्या उत्साहात पार पडला.या प्रसंगी केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी प्रा.जीवन जाधव हे विचारवंत पॅंथर असून त्यांनी आम्हाला सोडले असले तरी आम्ही त्यांना सोडले नाही.असे सांगितले

रिपब्लिकन चळवळीत ज्यांना जे काही शक्य नाही ते सर्व काही मला मिळाले आहे.पदासाठी मी कुठल्याही पक्षात गेलो नाही.सत्तेच्या पदापेक्षा कार्यकर्ता पद महत्वाचे आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा निळा झेंडा गावागावात पोहोचवायचा आहे.अनेक पक्षात लोक जाताना पाहतो आहे. मी तीन वेळा निवडून आलो पण पक्षाच्या चिन्हावर लढलो.कॉंग्रेस व राष्ट्रवादीचे चिन्ह घेतले नाही.असा दावा रामदास आठवले यांनी केला आहे.रिपब्लिकन ऐक्यासाठी मी नेहमीच आग्रही आहे.ॲड प्रकाश आंबेडकर, प्रा जोगेंद्र कवाडे,गवई यांनी एकत्र यावे ही माझी नेहमीच आग्रही भूमिका राहिलेली आहे.पण रिपब्लिकन ऐक्य होत नाही अशी खंत रामदास आठवले यांनी व्यक्त केली.रिपब्लिकन पक्षात सर्व जाती धर्माचे लोक असून त्यांना निळया झेंड्याखाली एकत्र आणावयाचे आहे.सध्याच्या युध्दावर भाष्य करताना ते म्हणाले,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले आहे की,युध्द मला नको,बुध्द हवा आहे.डॉ.रश्मी जीवन जाधव यांनी आपल्या मनोगतातून माझे वडील आरपीआयचे ४५ वर्ष कार्यकर्ते होते.असे सांगून यापुढे निष्ठेने काम करणार असल्याचे सांगून आठवले यांच्यावर कोणी फेसबुकच्या माध्यमातून आक्षेपार्ह पोस्ट टाकल्या तर त्या सहन केल्या जाणार नाही.त्यास जशास तसे उत्तर दिले जाईल असा ईशारा त्यांनी दिला. प्रा.जीवन जाधव यांनी रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षात असताना वेगळ्या ॲम्बिशनसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला.होता.पण पक्ष सोडून गेलो असताना देखील आठवले यांनी पून्हा पक्षात प्रवेश दिला त्याबद्दल आठवले यांचे आभार मानले.मी त्यांची माफी मागतो.पक्षाची बदनामी होणार नाही असे काम करणार नाही.असे ते म्हणाले.आठवले मला गुरुस्थानी आहेत असे सांगताना राष्ट्रवादीत मला शरदचंद्र पवार व सुप्रिया सुळे यांनी काही दिले नाही.मला विधानपरिषदेची आमदारकी काय,या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत माझ्या मुलीला डॉ. रश्मीला साधी उमेदवारी दिली नाही. असा आरोप जीवन जाधव यांनी केला. लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी म्हणतात,आठवले नेहमीच सर्वांना हसवण्याचे काम करतात.रिपब्लिकन ऐक्याची हाक त्यांनी घातली आहे.त्यामुळे तरुणांना आवाहन करताना प्रा.जाधव यांनी तुम्ही सेना,कॉंग्रेस,राष्ट्रवादीत जाऊ नका गो बॅक आठवले असे ते तळमळीने बोलले.या प्रसंगी वकील, डॉक्टर व प्राध्यापक यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला.त्यामध्ये डॉ.सोनली चव्हाण, सिद्धार्थ सोनावणे,ॲड.मंगला हिरे,डॉ.

# जिल्हा परिषद पुणेतील दिव्यांग आरोग्य कर्मचाऱ्यांचे आमरण उपोषण सुरू

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय :** पुणे जिल्हा परिषद पुणे येथील दिव्यांग आरोग्य सहाय्यकांची पदोन्नती प्रक्रिया 1 जानेवारी 2023 पासून प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.वारंवार पत्रव्यवहार करूनही न्याय न मिळाल्याने संबंधितांनी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती.न्यायालयाने वेळेत पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिल्यानंतरही अंमलबजावणी न झाल्याने कंटेम्प्ट याचिका दाखल करण्यात आली आहे.तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सध्याचे जिल्हाधिकारी सातारा संतोष पाटील यांनी सुनावणी घेऊन प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला होता;मात्र बदलीमुळे प्रक्रिया थांबली.सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी 14 फेब्रुवारी 2025 रोजी सुनावणी घेऊन 'मानिव दिनांक'देत पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले होते.विभागीय आयुक्तांनी 16 डिसेंबर 2025 रोजी मान्यता देऊन प्रस्ताव सादर केला असून, 24 मार्च 2025 रोजी संबंधित आदेश आरोग्य विभागाकडे पाठविण्यात आले आहेत.

तथापि,आरोग्य विभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ढिसाळ कामकाजामुळे




पदोन्नती प्रक्रियेत जाणीवपूर्वक अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप दिव्यांग कर्मचाऱ्यांनी केला आहे. लेखी तक्रारी करूनही ठोस कार्यवाही न झाल्याने दोन दिव्यांग आरोग्य सहाय्यकांनी 30 मार्च 2026 पासून जिल्हा परिषद पुणे येथे अमरण उपोषण सुरू केले आहे.पदोन्नती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा इशारा देण्यात आला असून,प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून न्याय द्यावा,अशी मागणी करण्यात आली आहे.